SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road,
Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १३.०५.२०२६ | अंक नं. ०३६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस! हा सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो / बर्डपार्क / झीप लाईन / ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल TM
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ १११/-*
2014 पासुन आपल्या सेवेत.. सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या नावाखाली महिलेची आर्थिक फसवणूक

## अहिल्यानगरमध्ये भोंदूबाबा वर गुन्हा दाखल, पोलिसांनी सर्जेपुरा येथून केली अटक

नगर – नगर शहरात अंधश्रद्धेच्या नावाखाली मोठी फसवणूक उघडकीस आली आहे. घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या आमिषाने एका भोंदूबाबाने महिलेकडून ५० हजार रुपये घेवून जादूटोणा, अघोरी विद्या केल्याचे दाखवत गुप्तधनही काढून दिले नाही आणि घेतलेले पैसेही परत न देता फसवणूक केली आहे. या प्रकरणी १२ मे रोजी रात्री उशिरा तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या भोंदू बाबाला पोलिसांनी अटक केली आहे. शिव अण्णासाहेब सोनवणे (रा. रंगभवन जवळ, सर्जेपुरा) असे या भोंदूबाबाचे नाव आहे.


शिव सोनवणे

याबाबत सोनाली महेश काळोखे (रा.रंगभवन जवळ, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या घराजवळच राहणारा भोंदूबाबा शिव सोनवणे याने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाला तुमच्या घराखाली मोठ्या प्रमाणात सोन्याचे गुप्तधन आहे. ते जादूटोणा आणि अघोरी विद्या करून काढून देतो असे आमिष दाखवले. त्यासाठी त्यांच्याकडून ५० हजार रुपये रोख स्वरुपात घेतले. या भोंदूबाबाच्या भूलथापांना बळी पडून फिर्यादीच्या कुटुंबीयांनी घर पाडले. त्यानंतर या भोंदू बाबाने त्या जागेत लिंबू, मानवी कवटी, हाडे, हळद, कुंकू, भस्म अशी पूजा मांडून मोठमोठ्याने मंत्र उच्चारून अघोरी विधी केला. परंतु कुठलेही गुप्तधन मिळवून न देता आणि घेतलेले ५० हजार रुपये न देता फसवणूक केली. तसेच आता ही जागा माझी आहे. तुम्ही जर माझ्या नादाला लागले तर तुमच्यावर अघोरी प्रयोग करून तुम्हाला संपवून टाकील अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी भोंदूबाबा शिव अण्णासाहेब सोनवणे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३५१ (२) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ आणि गुन्हे शोध पथकाने भोंदूबाबा शिव सोनवणे याला रात्रीच अटक केली आहे.

### जागा बळकावण्यासाठी कुटुंबाला बेदम मारहाण

दरम्यान भोंदू बाबा शिव सोनवणे याने गुप्तधनाच्या आमिषाने काळोखे कुटुंबाला घर पाडायला लावले. त्यांची आर्थिक फसवणूक केली. तसेच जागा बळकावण्यासाठी कुटुंबीयांना ११ मे रोजी रात्री १०.३० च्या सुमारास लाथाबुक्क्यांनी आणि कुऱ्हाडीच्या दांड्याने बेदम मारहाणही केली आहे. या मारहाण प्रकरणी आणखी एक गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी महेश भास्कर काळोखे (वय २९, रा. रंगभवन, सर्जेपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात शिव अण्णासाहेब सोनवणे, ओम अण्णासाहेब सोनवणे, कोहिनूर अण्णासाहेब सोनवणे (सर्व रा. सर्जेपुरा) आणि यश सागर सोळशे (रा. बोल्हेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिव सोनवणे आणि इतर आरोपींनी फिर्यादी महेश काळोखे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेला भाऊ दीपक आणि आई लक्ष्मी यांनाही आरोपींनी कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करत जखमी केले. तसेच त्यांच्या दुचाकीचेही नुकसान करून जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादी वरून शिव सोनवणे सह चौघांवर मारहाणीचा व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नीट पेपरफुटीप्रकरणी अहिल्यानगरमधून एकाला घेतले ताब्यात

## पुण्यातून झाला होता फरार, संशयित धनंजय लोखंडेची सीबीआय कडून कसून चौकशी

नगर – देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या 'नीट २०२६'च्या पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे आता अहिल्यानगरपर्यंत पोहोचले आहेत. केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) १३ मे रोजी सकाळी अहिल्यानगरमधून डॉ. धनंजय निवृत्ती लोखंडे (वय २६) या संशयिताला ताब्यात घेतले आहे. लोखंडे यानेच नाशिकच्या खैरनारला प्रश्नपत्रिका पुरविली होती, अशी माहिती आता समोर येत आहे. याबाबत सीबीआयने मोठी गुप्तता पाळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेपरफुटी प्रकरणात नाव समोर आल्यानंतर डॉ. धनंजय लोखंडे हा पुण्यातून फरार झाला होता. पोलीस तपासात त्याचे शेवटचे लोकेशन पुणे येथेच आढळले होते. मात्र, पोलिसांच्या कारवाईची कुणकुण लागताच त्याने तिथून पलायन केले आणि तो अहिल्यानगरमध्ये लपून बसला होता. लोखंडे याचे मूळ गाव राहुरी तालुक्यातील असल्याचे सांगण्यात येते. तो पुण्यातच राहत होता.

दरम्यान कारवाईच्या भीतीने लोखंडे अहिल्यानगरमध्ये आश्रयाला असल्याची खात्रीशीर माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. त्यानंतर सीबीआयचे विशेष तपास पथक आणि स्थानिक पोलिसांनी गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे संयुक्तरीत्या सापळा रचून त्याला ताब्यात घेतले.

नाशिकमधील शुभम मधुकर खैरनार याला पोलिसांनी अटक केल्यानंतर लोखंडे याचे नाव पुढे आले होते. लोखंडे यांच्याकडून खैरनारला प्रश्नपत्रिका पुरविण्यात आली होती, असेही सांगण्यात येते. त्यामुळे लोखंडे हा या गुन्हयातील मुख्य आरोपी आहे की सूत्रधार अन्य कोणी आहे, याचा तपास करण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

### कोण आहे हा धनंजय लोखंडे ?

नीट पेपरफुटी प्रकरणात नाशिकमधून शुभम खैरनारला ताब्यात घेतल्यानंतर तपासादरम्यान धनंजय लोखंडेचे नाव समोर आले. २६ वर्षीय धनंजय निवृत्ती लोखंडे हा राहुरी तालुक्यातील महेगाव (महाडुक सेंटर) येथील रहिवासी आहे. त्याचे वडील शाळेत लिपिक आहेत, तर त्याचा मोठा भाऊ डॉक्टर आहे.

धनंजयने दोन वर्षांपूर्वी कर्नाटकातील मंगळूरु येथून बीएएमएस पूर्ण केले. गेल्या चार वर्षांपासून तो पुणे जिल्ह्यातील वाघोली परिसरात राहत होता. शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याने तिथेच प्रॅक्टिस सुरू केली. आपल्या वैद्यकीय प्रॅक्टिससोबतच तो मेडिकल ॲडमिशन कन्सल्टंट म्हणूनही काम करत होता. पश्चिम महाराष्ट्रात पसरलेल्या या पेपरफुटीच्या जाळ्याची व्याप्ती किती आहे आणि यात किती डॉक्टर, एजंट किंवा इतर व्यक्ती सामील आहेत, याचा तपास सीबीआय करत आहे.

### पुण्यातून एक महिलेलाही घेतले ताब्यात

नीट पेपर फुटी प्रकरणात पुणे पोलिसांनी एका महिलेला ताब्यात घेतले आहे. यात विद्यार्थ्यांना आरोपीपर्यंत पोहोचवण्यास हि महिला मदत करत आल्याचा संशय पोलिसांना आहे. तपासात पुणे पोलिसांनी १३ मे रोजी पहाटे मनीषा वाघमारे या महिलेला ताब्यात घेतले.संबंधित महिला ब्युटी पार्लर चालवत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. अहिल्यानगरमधून अटक करण्यात ताब्यात घेण्यात आलेल्या धनंजय लोखंडेपर्यंत विद्यार्थ्यांना पोहोचवण्याचे काम मनीषा वाघमारे करत असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.

कशाला घेता ३इन १ व ४ इन १ जेव्हा रु.५० मध्ये मिळतोय लाभच लाभ शुभलाभ ६ इन १ ६ सुवासिक सुगंधासह
शुभलाभ बेस्ट ६ इन १ १२०ग्रॅम
रु. ६५ चा रु. ५० मध्ये
तसेच केशर चंदन, इंडियन कस्तुरी
निळकंठ, अगरबत्तीचे विक्रेते
स्टॉ. केवल अगरबत्ती
रसरंग मिसळ समोर आडते बाजार अ.नगर

पाहिजेत
फ्लेक्स प्रिंटिंग ऑफिसमध्ये कामासाठी मुलगा पाहिजे.
• मशिन ऑपरेटर (जागा-4)
कॉम्प्युटरचे बेसिक ज्ञान आवश्यक.
नमोह प्रिंटर्स
जुना बाजार, बॉम्बे बेकरी समोर, अहिल्यानगर
संपर्क-९४०३२३२३२३

# बसस्थानकावर महिलेची फसवणूक; सोन्याचे मंगळसूत्र लंपास; गुन्हा दाखल

नगर – स्वस्तिक चौकातील पुणेबस स्थानक परिसरात अनोळखी भामट्याने महिलेचा विश्वास संपादन करून ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अलका सुधाकर पोळ (वय ६५, रा. रांजणी, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला कामानिमित्त पुणे येथे जाण्यासाठी बस स्थानकावर आल्या होत्या. दुपारी एक ते दोन वाजेच्या सुमारास त्या बसची वाट पाहत असताना, एक अज्ञात तरुण त्यांच्या जवळ आला. त्याने महिलेला 'आई, उन्हात नका बसू, सावलीत चला' असे म्हणून विश्वासात घेतले. बसमध्ये चढताना गर्दी होईल, त्यामुळे गळ्यातील दागिने सुरक्षित ठेवण्यासाठी माझ्याकडे द्या, असे त्याने महिलेला सांगितले. भामट्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून महिलेने आपले १३ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र काढून त्या तरुणाकडे दिले.

मंगळसूत्र हातात येताच तो तरुण गर्दीचा फायदा घेऊन तिथून पसार झाला. थोड्या वेळाने तो तरुण परत न आल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. यानंतर त्यांनी तातडीने पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवला असून बस स्थानक परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरणाद्वारे तपास सुरू केला आहे. प्रवासादरम्यान कोणत्याही अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये आणि आपले दागिने स्वतःकडेच सुरक्षित ठेवावेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यात उष्मालाटेचा 'यलो अलर्ट'

नगर – भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार १२ ते १४ मे दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात काही ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्याबरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे, तसेच घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करावा. घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हापासून बचाव करण्यासाठी हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा व थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टी. व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

तसेच दुपारी १२ ते ३ वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा, उन्हात अतिकष्टाचे कामे करू नका, बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत, गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे, दारु, चहा, कॉफी व कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका, उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नका, उन्हाच्या कालावधीत शक्यतो स्वयंपाक करण्याचे टाळावे व मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात. उष्माघाताची लक्षणे दिसताच तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली

हे राम । हे राम



स्व. चि. गणेश सुनिल परदेशी

सभी को सुचित करते है कि, चि. गणेश सुनिल परदेशी इनका मंगलवार ता. ०५/०५/२०२६ को स्वर्गवास हुआ है ।

✲ दसवाँ ✲
गुरुवार ता. १४/०५/२०२६, समय : सुबह ९.०० बजे, स्थान : अमरधाम, नालेगाव, अहिल्यानगर यहा होगा.

शोकाकूल – जय सुनिल परदेशी – मो. 7020985923
अमरजीत रुपचंद परदेशी – मो. 9922664837
विश्वजीत रुपचंद परदेशी (राठोड)

पता : निजी निवास, दिनेश साडी के पास, छाया टॉकीज के पास, चितळेरोड, अहिल्यानगर

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल अँण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
मोफत मणके विकार तपासणी शिबीर
शुक्रवार – दि. १५-०५-२०२६, ✲ वेळ : सकाळी १० ते २
पाठदुखी व मणक्याच्या आजारांवर निदान, उपचार व शस्त्रक्रिया
मणकेविकार व अस्थिरोग तज्ञ
डॉ. भरत जगताप, डॉ. श्रीकांत दलाल, डॉ. विशाल शिंदे, डॉ. रोहन धोत्रे
एम.आर.आय. रू. 2500/- रात्री 1.00 ते पहाटे 5.00 या वेळेत एम.आर.आय. केल्यास रु. 750/- ची सुट : संपर्क : 9404297411
सिटीस्कॅन रू. 1250/- संपर्क : 9404299911
24 तास आनंदऋषिजी ब्लड बँक
डिजिटल एक्सरे रू. 250/- सोनोग्राफी रू. 800/- संपर्क : 9405271878
महावीर भवन रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र
होम ब्लड सॅम्पल कलेक्शन मो. नं. 9373807842
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधुनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर – ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
# नवा मराठा
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# भुतकरवाडी येथे बंद घर फोडून चोरी; पावणेदोन लाखांचा ऐवज लंपास

नगर – शहरात चोऱ्यांचे सत्र सुरूच असून, भुतकरवाडी परिसरातील पंपिंग स्टेशन रोडवर एका बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी १ लाख ८५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अजित प्रेमराज शेकडे (वय ५३, रा. भूतकर वाडी) यांनी १२ मे रोजी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे एमआयडीसीमधील एका खासगी कंपनीत कामाला आहेत. ते आपल्या कुटुंबासह पुण्यात एका लग्नासाठी गेले होते. ८ मे रोजी सकाळी त्यांनी आपले घर कुलूप लावून बंद केले होते. दरम्यान, चोरट्यांनी घराचा कडी कोयंडा उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील कपाटातील सामानाची उचकपाचक करून सोन्याच्या दोन अंगठ्या, रोख रक्कम आणि लॅपटॉप असा एकूण १ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

११ मे रोजी पहाटे शेकडे कुटुंब घरी परतले असता, त्यांना घराच्या दरवाजाचा कोयंडा तुटलेला दिसला. घरात सर्व सामान अस्ताव्यस्त पडले होते. त्यांनी तातडीने तोफखाना पोलिसांना याची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. यावेळी ठसेतज्ज्ञ आणि श्वान पथकालाही पाचारण करण्यात आले होते. पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पोलीस उपनिरीक्षक दळवी या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# नगरमध्ये ब्रँडेड कंपन्यांची नावे वापरून बनावट शाम्पूची विक्री

## पोलिसांनी परप्रांतीय टोळीला ठोकल्या बेड्या, १ लाखाचा मुद्देमाल जप्त

नगर – प्रसिद्ध ब्रँड्सच्या शाम्पूच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये घातक केमिकल वापरून तयार केलेला शाम्पू भरून त्यांची विक्री करणाऱ्या उत्तर प्रदेशातील एका टोळीला एमआयडीसी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या टोळीकडून १ लाख १८६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की ९ मे रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास नागापूर येथील आठवडे बाजारात एम.आय.डी.सी. पोलीस पेट्रोलिंग करत होते. त्यावेळी सह्याद्री चौकात एक व्यक्ती नामांकित कंपन्यांचे शॅम्पू अत्यंत स्वस्त दरात विकताना आढळली. संशय आल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आणि चौकशी केली असता एका मोठ्या रॅकेटचे धागेदोरे हाती लागले.पकडलेला आरोपी शानमोहम्मद पप्पूखान आलबी (वय २५, रा.उत्तर प्रदेश) याने धक्कादायक कबुली दिली.



नगरमध्ये ब्रँडेड कंपन्यांची नावे वापरून बनावट शाम्पूची विक्री करणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

त्याने त्याचे साथीदार रब्बानी रज्जाक अब्बास आणि फैजान अहमदअली खान यांच्या मदतीने हा काळाबाजार सुरू केला होता. ही टोळी हिंदुस्तान युनिलिव्हरच्या क्लीनिक प्लस, डव्ह, हेड अँड शोल्डर्स आणि पॅन्टीन यांसारख्या प्रसिद्ध कंपन्यांच्या रिकाम्या बाटल्या गोळा करायची.त्यात अज्ञात स्वस्त केमिकल आणि पावडरचे मिश्रण भरले जायचे. बनावट ट्रेडमार्क आणि लेबलचा वापर करून हे शॅम्पू अस्सल असल्याचे भासवून सामान्य ग्राहकांना विकले जायचे.पोलिस पथकाने केलेल्या कारवाईत तब्बल १ लाख १८६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये शॅम्पूने भरलेल्या शेकडो बाटल्या, पॅकिंगचे साहित्य आणि शॅम्पू बनवण्यासाठी लागणारे घातक केमिकल पावडर यांचा समावेश आहे. मानवी आरोग्यास अत्यंत अपायकारक असलेला हा बनावट माल जप्त करून पोलिसांनी पुढील मोठा अनर्थ टाळला आहे.

या प्रकरणी हिंदुस्तान युनिलिव्हरचे फील्ड ऑफिसर किरीत गुणवंतराय पंड्या यांच्या फिर्यादीवरून एम.आय. डी.सी.पोलीस स्टेशन येथे बीएनएस कलम ३१८(४), कॉपीराईट क्ट १९५७ (कलम ६३, ६५) आणि ट्रेडमार्क क्ट १९९९ (कलम १०३, १०४) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे,उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक बी.चौधरी,स.फौ.राकेश खेडकर,पो.हे.कॉ. राजू सुद्रिक, शैलेश रोहोकले, सचिन आडबल, किशोर जाधव, दीपक फुंदे, नवनाथ दहिफळे व दक्षिण मोबाईल सेलचे पोलीस अंमलदार राहुल गुंडू यांनी केली आहे.



रेल्वे स्थानकात प्रवाशांचे मोबाईल चोरणारे दोघांना २ तासांत पकडल्यानंतर त्यांच्यासमवेत रेल्वे पोलिसांचे पथक.

# रेल्वे स्थानकातून मोबाईल चोरणारे पकडले

नगर – रेल्वे स्थानकात प्रवाशांचे मोबाइल चोरी करणाऱ्या चोरट्यांना अवघ्या दोन तासांत अटक करण्यात आली असल्याची माहिती दौंड रेल्वेचे पोलिस निरीक्षक राजेंद्र गायकवाड यांनी दिली. याप्रकरणी सचिन भोसले (रा. बोरीबेल, ता. दौंड), विजय काळे (रा बेलवंडी. ता. श्रीगोंदा) या दोघांना अटक करण्यात आली आहे.

दौंड रेल्वे स्थानकात प्लॅटफॉर्मवर २८ परप्रांतीय मजूर ग्वालियर एक्स्प्रेसने मध्यरात्रीच्या सुमारास दौंडला उतरले. सकाळी त्यांना पुणे येथे जायचे होते. परिणामी, गाढ झोपेत असलेल्या या परप्रांतीय मजुरांपैकी ८ प्रवाशांचे मोबाइल चोरून चोरटे फरार झाले. त्यानंतर पोलिसांना घटना कळताच दौंड रेल्वे पोलिस आणि गुन्हे अन्वेषण शाखा, आरपीएफ गुप्तचर शाखा यांनी एकत्रितपणे तपासाची सूत्रे फिरविले. सीसीटीव्ही फुटेज आणि खबऱ्यांमार्फत माहिती घेतली आणि दोन तासांत गुन्हेगारांचा शोध लावून त्यांच्याकडून पाच मोबाइल ताब्यात घेतले.

ही कारवाई पुणे जिल्हा लोहमार्ग पोलिस अधीक्षक डॉ. राजकुमार शिंदे, अपर पोलिस अधीक्षक रोहिदास पवार, सहायक पोलिस निरीक्षक बाळासाहेब अंतरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राजेंद्र गायकवाड, सहायक पोलिस निरीक्षक हिमालय जोशी, उमेश कोंडे, प्रियांका खरात, आकाश चव्हाण, शुभम बांगर, मंगेश शेळके, दयानंद शरणार्थी, आनंद वाघमारे, धनंजय वीर तसेच आरपीएफ क्राईम ब्रँचचे एकनाथ गडदे, रामनाथ केकाण, धनंजय यादव या पोलिस पथकाने केली.

# लॉन समोरील पत्र्यांची चोरी

नगर – शहरातील काटवण खंडोबा परिसरातील विठाई लॉनसमोर सुरू असलेल्या शेडच्या कामासाठी आणलेले २६ हजार ६०० रुपये किमतीचे लोखंडी पत्रे अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अमोल काशिनाथ गाडळकर यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी अमोल काडळकर हे विठाई लॉन चे संचालक आहेत. सध्या लॉनच्या समोर शेडचे काम सुरु असल्याने त्यांनी सुयोग पत्रा डेपो येथून विविध आकाराचे ८८ पत्रे आणून ठेवले होते. ९ मे रोजी पहाटेच्या सुमारास काम संपवून घरी जाताना सर्व पत्रे जागेवरच होते. मात्र, सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास कामगार कामावर आले असता त्यांना पत्रे कमी असल्याचे दिसून आले. गाडळकर यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता, १३ फूट लांबीचे एकूण १४ पत्रे चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले.

परिसरात सर्वत्र शोध घेऊनही पत्रे मिळून न आल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. चोरीस गेलेल्या एका पत्र्याची किंमत १९०० रुपये आहे. पोलिसांनी याप्रकरणी चोरीचा गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस हवालदार शरद वाघ करत आहेत.

# १४ दिवस उलटूनही पोलिसांकडून जबरी चोरीचा गुन्हा दाखल नाही

नगर – शहरातील नालेगाव परिसरात एका विधवा महिलेला चाकूचा धाक दाखवून मारहाण करत दागिने लुटल्याची धक्कादायक घटना घडून १४ दिवस उलटले, तरी अद्याप तोफखाना पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे पीडितेने तोफखाना पोलीस ठाणे गाठून संताप व्यक्त केला. तसेच पीडित महिलेने याप्रकरणी पोलीस निरीक्षकांना लेखी निवेदन देऊन न्याय देण्याची मागणी केली आहे.

सुनंदा संतोष वामन (रा. वारुळाचा मारुती रोड, नालेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३० एप्रिल रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास त्या वारुळाचा मारुती रोड परिसरातील आपल्या शेतात काम करत होत्या. यावेळी दुचाकीवरून आलेल्या तीन अज्ञात व्यक्तींपैकी दोघांनी शेतात प्रवेश केला. एकजण गाडीवरच बसून होता. शेतात गेलेल्या दोघांनी सुनंदा वामन यांना चाकूचा धाक दाखवून जबर मारहाण केली आणि त्यांच्या अंगावरील कानातले, गळ्यातले व नाकातील मुरनी असा सर्व सोन्याचा ऐवज काढून घेतला. त्यानंतर हे आरोपी रस्त्यावर थांबलेल्या तिसऱ्या साथीदाराच्या दुचाकीवर बसून सुसाट वेगाने पसार झाले.

या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने सुनंदा वामन यांना ३० एप्रिल ते ३ मे या कालावधीत जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल व्हावे लागले होते. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात चौकशी केली असता या घटनेला १४ दिवस होऊनही अद्याप गुन्हेगारांवर गुन्हा दाखल झाला नसल्याचे त्यांना समजले.

मी एक विधवा स्त्री असून मला भरदिवसा मारहाण करून लुटले गेले आहे. पोलीस प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करणे ही खेदाची गोष्ट आहे, अशा शब्दांत सुनंदा वामन यांनी आपली व्यथा मांडली आहे. गुन्हेगारांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.

# अहिल्यानगर शहरातील सिमेंट कॉंक्रिट रस्ते?

## तर विरोध करायला पाहिजे; महापालिका प्रशासनावर, लोकप्रतिनीधींवर दबाव आणणे आवश्यक

मी पुण्यात स्थायिक झालो असलो तरी शहरातील नागरी प्रश्नांवर आस्था असल्यामुळे व्यक्त होत असतो. दोन दिवसातील मुक्कामात शहरातून फिरलो. अनेक मित्रांशी बोललो. त्यात महत्वाचा विषय अर्थातच शहरातील सिमेंट कॉंक्रिटचे (सी सी रस्ते) रस्ते हाच होता.

शहरातील ज्या रस्त्यावरुन जड वाहतूक होते तेथे सी सी रस्ते करायला काहीच हरकत नाही. अथवा शहरातील रस्त्यांची सतत होणारी चाळण थांबवायची असेल तर सी सी रस्तेही आवश्यक आहे असे म्हणता येईल. मात्र सरसकट सी सी रस्ते करताना त्यांच्या फायदा– तोट्याचा विचार करताना फक्त एकाच मुद्याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे. तो आपल्या शहरातील सर्व थरातील नागरिकांसाठी महत्वाचा आहे. तो आहे, या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांमुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाण १ ते ५ टक्यावर येणार आहे. यामुळे भविष्यात आपल्या घरात अथवा जवळपास असणाऱ्या बोअरवेल, विहीरीचे पाणी कमी होणार आहे.

आपल्या शहराला पाणीपुरवठा करणारी साखळी महापालिकेच्या पाणीपुरवठ्यापेक्षा प्रत्येक घरात असलेल्या अथवा सार्वजनिक ठिकाणी असलेल्या बोअरवेल अथवा विहीरींवर जास्त अवलंबून आहे. या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांमुळे या साखळीवर भविष्यात जास्त परिणाम होणार आहे. याची चिंता महानगरपालिकेने निश्चित केली नसेल. सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते करताना पावसाळ्यात जमिनीत पाणी मुरविण्याची अथवा रिचार्जची तरतूद महानगरपालिकेने करणे आवश्यक आहे. ती तरतूद न केल्याने भविष्यात हे सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते बोअरवेल, विहीरीचे पाणी पळवतील हे निश्चित आहे. यावर उपाय नाहीत का? निश्चितच आहेत पण महानगरपालिकेने, काम करणाऱ्या ठेकेदाराने, आपण निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधीनी जाणूनबुजून अथवा अज्ञानामुळे या कडे दुर्लक्ष केले आहे असे वाटते.

आपण जर वर्तमान वाचत असाल, बातम्या बघत असाल तर आपल्या हे सहज लक्षात येईल की पुणे, मुंबई, बंगलोर सारख्या अनेक शहरांत सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते समस्या होऊन बसले आहेत. रस्ते करताना पाणी जमिनीत मुरण्यासाठी आवश्यक उपाय जे आहेत ते न केल्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणावर तुंबत असल्याने पूरपरिस्थिती निर्माण होत आहे.

यासाठी काय करायला पाहिजे? तर सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्यांना विरोध करायला पाहिजे. हे शक्य नसेल तर सिमेंट कॉंक्रिटचे रस्ते करताना ठिकठिकाणी जमिनीत पाणी मुरविण्यासाठी तरतूद करायला पाहिजे.

सी सी रस्ते बांधताना जमिनीचा नैसर्गिक उतार बदलला जातो आणि पाणी जिरविण्याचे मार्ग बंद होतात. यामुळे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी रस्त्यावरुन, गटारीतून नदीला वाहून जाते.

रस्ते करताना रस्त्यांच्या कडेला 'रेन गार्डन' किंवा पाणी जिरवण्यासाठी शोष खड्डे बनवणे गरजेचे आहे. जेणेकरुन पावसाचे पाणी जमिनीत मुरेल. रस्त्यांवर ठराविक अंतरावर सच्छिद्र पेव्हर ब्लॉक (Pervious Concrete) वापरणे आवश्यक आहे. हे ब्लॉक पावसाचे पाणी थेट जमिनीत जाऊ देतात.

रस्ते बांधताना पाण्याचा प्रवाह नैसर्गिक उताराच्या दिशेने असेल याची काळजी घ्यावी आणि पाणी साचणाऱ्या ठिकाणी शोष खड्डे बनवावेत. या पध्दतीचा वापर करून पावसाळ्यातील पाणी वाया जाण्यापासून वाचविता येते. जमिनीतील पाण्याची पातळी टिकवता येते.

वाढत्या कॉंक्रिटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याचे प्रमाण गेल्या १५ वर्षांत ३५ टक्क्यांवरुन अवघ्या पाच टक्क्यांवर आले आहे. सिमेंट कॉंक्रिट रस्ता हा 'इम्पेरव्हियस सरफेस' आहे. म्हणजे असा पृष्ठभाग ज्यामधून पाणी जमिनीतील जिरु शकत नाही. याला मराठीत 'अभेद्य पृष्ठभाग' किंवा 'पाणी न मुरणारी जमीन' असे म्हणतात. पाणी तर जमिनीत मुरत नाही, उपसा तर वाढत जातो. केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार १०० टक्के बांधकाम असलेल्या भागात भूजल रिचार्ज ९०% ने कमी होते. रस्ते आणि नाली दोन्ही पक्की असतील तर पाणी मुरायला जागाच शिल्लक राहात नाही असे म्हंटले आहे. ही धोक्याची घंटा आहे. या सिमेंट कॉंक्रिट रस्त्यांमुळे जमिनीत जाणारे पाणी कमी होणार हे निश्चित आहे. यासाठी महापालिका प्रशासन, लोकप्रतिनिधींवर दबाव आणणे आवश्यक आहे.

अर्थात हे होणे नाही. दहशतीत जगणारा समाज दबाव कसा आणणार?

सुरुवातीलाच म्हंटल्याप्रमाणे सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्यांचे फायदे–तोटे निश्चितच आहे. पण त्याचा विचार याठिकाणी केला नाही. सिमेंट कॉंक्रिटच्या रस्त्यांमुळे पाणी जमिनीत मुरणार नाही. हा धोका दाखवून देण्याच्या उद्देशाने केलेला हा लेखन प्रपंच आहे. पटलं तर विचार करा. नाहीतर सोडून द्या, दुर्लक्ष करा. यापूर्वी मी फेज २ च्या अपयशाबद्दल लिहिले होते.

त्याचे काय झाले?

**– शिरीष प्रभाकर बापट, रा.बालेवाडी, पुणे. मोबा. ९७३०६५९९८३**



बंद पडलेल्या कचरा डेपोतील जुगार अड्ड्यावर छापा टाकून पकडलेल्या आरोपींसमवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

# बंद पडलेल्या कचरा डेपोतील जुगार अड्ड्यावर छापा; ३ लाख ७२ हजारांचा मुद्देमाल जप्त, ११ जण ताब्यात


नगर – एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या पथकाने नवनागापूर परिसरात बंद पडलेल्या कचरा डेपो मध्ये चालणाऱ्या 'तिरट' नावाच्या हार–जितीच्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून मोठी कारवाई केली आहे.या कारवाईत पोलिसांनी ३ लाख ७२ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एकूण ११ जणांना ताब्यात घेतले आहे, तर एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला आहे.

दि.११ मे रोजी रात्री ८:३० च्या सुमारास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सपोनि.माणिकराव चौधरी यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की,नवनागापूर येथील बंद पडलेल्या कचरा डेपोमध्ये काही इसम लाईटच्या उजेडात पैसे लावून जुगार खेळत आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून कचरा डेपोच्या मोकळ्या जागेत छापा टाकला.

पोलिसांनी घटनास्थळावरून ११ जणांना ताब्यात घेतले आहे. या छाप्यात पोलिसांनी जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण ३ लाख ७२ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपींविरुद्ध एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन,अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे स.पो.नि.माणिक बी.चौधरी, उपनिरीक्षक विकास जाधव, स.फौ.फकीर शेख, स.फौ.शिंदे, पो.हे.कॉ.राजू सुद्रिक, पितळे, आढाव, किशोर जाधव, सचिन हरदास, सूरज देशमुख, अक्षय रोहोकले व शेरकर यांच्या पथकाने केली आहे.

# मदन तरोटे यांचे दुःखद निधन



नगर – चितळे रोड येथील रहिवासी मदन शाहू तरोटे (वय ६९) यांचे १२ मे रोजी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १३ मे रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# सुमनबाई बिबवे यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर – येथील सुमनबाई लक्ष्मण बिबवे (वय ९०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अ.नगर डिस्ट्रिक्ट को–ऑप. बँकेचे सेवानिवृत्त मॅनेजर दत्तात्रय बिबवे यांच्या मातोश्री होत.

# कॉलेजच्या वादातून तरुणावर चाकूने हल्ला; गुलमोहर रोडवरील घटना, गुन्हा दाखल

नगर – कॉलेजमध्ये झालेल्या किरकोळ भांडणाचे रुपांतर टोकाच्या वादात होऊन एका १९ वर्षीय विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. ही घटना गुलमोहर रोडवरील आनंद शाळेसमोर ११ मे रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अभिषेक सोमनाथ लांडगे (वय १९, रा. नरहरी नगर, गुलमोहर रोड) या विद्यार्थ्याने फिर्याद दिली आहे. अभिषेक हा एका औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयात शिक्षण घेतो. त्याचा मित्र संतोष महाडिक आणि आरोपी विशाल नागरगोजे यांच्यात कॉलेजमध्ये दुपारी भांडण झाले होते. याच वादाचा राग मनात धरून मुख्य आरोपी अविनाश विश्वास जायभाय याने संतोषला फोनवरून शिवीगाळ केली आणि चर्चेसाठी बोलावले.

सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास अभिषेक, संतोष आणि रोहन लांडगे हे नाथकृपा इंटरप्राईजेस कार्यालयाबाहेर आले असता, तिथे अविनाश जायभाय आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. यावेळी झालेल्या झटापटीत अविनाशने अभिषेकला संतोष समजून त्याच्यावर चाकूने वार केले. अभिषेकच्या डाव्या पायाच्या मांडीवर चार ठिकाणी जखमा झाल्या आहेत. हल्ल्यानंतर आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. जखमी अभिषेकवर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी अविनाश जायभाय व त्याच्या साथीदारांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

# प्रभाग १७ मध्ये स्वच्छता, नालेसफाईने धरला वेग

नगर – महापालिकेच्या प्रभाग १७ मध्ये स्वच्छता, नालेसफाई जोरात सुरू आहे. या प्रभागात स्वच्छतेसाठी कर्मचाऱ्यांची संख्या वाढविण्यात आली असून, ज्या परिसरात नेहमी पाणी साचते अशा ठिकाणची नालेसफाई प्राधान्याने हाती घेण्यात आली आहे.

नगरसेवक मयूर बांगरे यांनी प्रभाग १७ मध्ये नालेसफाई करण्याची मागणी केली होती. त्यानुसार महापालिकेने ही सफाईची मोहिम हाती घेतली आहे. प्रभाग क्रमांक १७ मधील मल्हार चौक ते रेल्वे स्टेशन परिसर, आदर्श गौतमनगर, रोहिदासवाडी, कायनेटिक चौक परिसरात ही स्वच्छता मोहिम सुरु असल्याचे सांगण्यात आले. नाल्यामधील गाळ काढणे, खुरटी झाडे–झुडपे काढून टाकणे, प्रवाह सुरळीत करणे अशी कामे या परिसरात सुरु आहेत. तसेच अरणगाव रोड परिसर (सुभद्रानगर, समर्थनगर, हनुमाननगर, इंदिरानगर), केडगाव परिसर (नवीन विकासित भाग व जुने गाव) तसेच लोंढे मळा बायपास परिसर येथे मुख्य ओढे व अंतर्गत ड्रेनेज लाईनची तात्काळ व सखोल सफाई करण्याची मागणी बांगरे यांनी केली होती. पुढील टप्प्यात सर्व भागात स्वच्छता व नालेसफाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# गृहिणी

## आरोग्य

### तासन्तास इअरफोन वापरता का?

आजकाल जास्त वेळ इअरफोन वापरणे ही एक सामान्य सवय झाली आहे, परंतु याचा तुमच्या श्रवणशक्तीवर गंभीर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे, सतर्क राहणे आणि वेळेपूर्वीच खबरदारी घेणे महत्त्वाचे आहे. शरीरातील सर्वात महत्त्वाच्या अवयवांपैकी एक असूनही, आपण अनेकदा आपल्या कानांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. या दुर्लक्षाचा धोका यावरून लक्षात येतो की, जगभरात ५ ते १९ वयोगटातील अंदाजे ९५.१ दशलक्ष मुले कमी-अधिक प्रमाणात श्रवणदोषाने ग्रस्त आहेत. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेता, जागतिक आरोग्य संघटनेने लोकांना त्यांच्या श्रवण आरोग्याबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. थेट कार्यक्रमात किंवा संगीत कार्यक्रमात वक्त्याच्या खूप जवळ उभे राहणे टाळण्याचा सल्ला देते. एखाद्या गोंगाटाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहिल्यानंतर, आपल्या कानांना विश्रांती द्या आणि दुसऱ्या दिवशी शांत वातावरणात राहा. गेमर्सना सल्ला दिला जातो की त्यांनी पार्श्वभूमीतील आवाजामुळे व्हॉल्यूम वाढवण्याची गरज टाळण्यासाठी नॉईज-कॅन्सिलिंग हेडफोन वापरावेत. तसेच, स्क्रीन टाइम आणि हेडफोन वापरावर मर्यादा घालाव्यात. श्रवणदोष ही केवळ एक शारीरिक कमतरता नाही; त्याचा परिणाम व्यक्तीच्या जीवनमानावर आणि मानसिक आरोग्यावरही होतो.

## पाककला

### सुगंधी मँगो मोदक

**साहित्य** - आंब्याचा रस: १ वाटी, खवा: २ वाट्या, साखर: १/२ वाटी, वेलची पूड: १/२ छोटा चमचा, केशर: ५-६ दुधात भिजवलेले, तूप: १ मोठा चमचा

**कृती** - सर्वात आधी एका नॉन-स्टिक कढईत एक चमचा तूप गरम करा. त्यात किसलेला खवा घालून मध्यम आचेवर ५-७ मिनिटे नीट परतून घ्या. खवा मऊ झाला की त्याचा रंग हलका बदलायला हवा. आता यात आंब्याचा रस आणि साखर मिसळा. हे मिश्रण सतत ढवळत राहा जेणेकरून ते कढईला चिकटणार नाही. मिश्रण घट्ट होईपर्यंत शिजवा. जेव्हा हे मिश्रण कढईच्या कडा सोडू लागेल आणि त्याचा एक गोळा तयार होईल, तेव्हा समजावे की ते तयार आहे. आता यात वेलची पूड आणि केशरचे दूध घालून व्यवस्थित मिक्स करा. गॅस बंद करा आणि हे मिश्रण एका प्लेटमध्ये काढून पूर्णपणे थंड होऊ द्या. मिश्रण थोडे कोमट असतानाच हाताला थोडे तूप लावा. मोदकाच्या साच्यालाही आतून तूप लावून घ्या. साच्यात हे मिश्रण भरून सुबक मँगो मोदक तयार करा.

## वास्तू

### संतान प्राप्तीसाठी

✻ ईशान्य कोपऱ्यातील कोणतेही वास्तुदोष, जसे की जड बांधकाम, कापलेला किंवा उंच भाग, पायऱ्या, शौचालय इत्यादी, संततीप्राप्तीच्या सुखात अडथळा आणू शकतात. त्यामुळे, ईशान्य कोपऱ्यात कोणताही वास्तुदोष असल्यास, सर्वप्रथम तो दोष दूर करा.

✻ जर घराचा मुख्य दरवाजा पूर्वेला पर्जन्य स्थानात (स्थान क्रमांक २) उघडत असेल तर मुलींचा जन्म होतो.

## सौंदर्य

आठवड्यातून दोन वेळा बेसन आणि दही मिक्स करुन अथवा हळद आणि दूध एकत्र करुन फेसपॅक लावावा. याने चेहऱ्यावर ग्लो येईल.

## सल्ला

✻ कोथिंबीर पाण्यात ठेवली तर जास्त दिवस टिकते.

✻ बटाटे आणि कांदे वेगवेगळे ठेवावेत.

✻ गॅस, स्टोव्ह साफ करण्यासाठी लिंबू + बेकिंग सोडा यांचे मिश्रण वापरावे.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १४ मे २०२६

**प्रदोष, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, रेवती २२|३४, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : आज जास्त खर्च होईल. इतरांना सहकार्य कराल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल.

**वृषभ** : एखादे नवे नाते आपल्यावर प्रभाव पाडेल. प्रवासाचे योग संभवतात. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मिथुन** : संस्था, संघटनेत महत्वाचे काम मिळू शकते. प्रवासाचे योग संभवतात. हितशत्रूंकडून त्रास संभवतो.

**कर्क** : वाहने व उपकरणे बिघडतील. नवीन कार्यात, योजनांमध्ये यश मिळेल. मिळकतीत वाढ होईल.

**सिंह** : आरोग्याची व खाण्या-पिण्याची काळजी घ्या. मागील उधारी व उसनवारी वसूल होईल.

**कन्या** : प्रवासाचे योग संभवतात. कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. आज आपल्या करीयरशी संबंधित सर्व बाबी स्पष्ट होतील.

**तूळ** : आरोग्याच्या समस्या निर्माण होतील. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळणे श्रेयस्कर राहिल.

**वृश्चिक** : आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी न बाळगल्याने नुकसान संभवते. प्रेम प्रकरणात दोघांसाठी आजचा दिवस चांगला आहे.

**धनु** : जोखीम निर्माण होतील. मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**मकर** : अधिकारी वर्गाचे पाठबळ मिळेल. शत्रू पराभूत होतील. संभाषणात सावधगिरी न बाळगल्याने संकट ओढावून घेताल.

**कुंभ** : व्यापार-व्यवसायात परिस्थिती मध्यम राहील. कोणत्याही प्रकारचे जोखिम अंगलट येईल.

**मीन** : आरोग्य उत्तम राहील. अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेली कामे पूर्ण होतील. व्यापार व्यवसायात अनुकूलता येईल.

## शब्दगंध क्र. ७४२९ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | | |
| ■ | ■ | ■ | ९ | | ■ | १० | |
| ११ | १२ | | | ■ | १३ | | ■ |
| १४ | | ■ | १५ | | | ■ | १६ |
| ■ | १७ | १८ | ■ | ■ | १९ | २० | |
| २१ | ■ | २२ | २३ | | ■ | २४ | |
| २५ | | | | ■ | २६ | | |

**आडवे शब्द** - १) पाहुणचार; आदरातिथ्य ५) एका हाताची ओंजळ ७) प्रणाम; सुरुवात; वंदन; प्रारंभ ८) शरीरासंबंधी ९) भिन्न; दुसरा; निराळा १०) स्वाद; गोडी; रुची; रस ११) पुरुषाचे एक वस्त्र; विजार; तुमान १३) आंब्याचे बी; बाठा १४) राक्षसी; डाकीण १५) प्रसाद १७) आकाश; गगन; अंबर १९) रंगभूमीवरचा खेळ; सोंग; ढोंग २२) वातायन; खिडकी; झरोका २४) भिंतीवर सरपटणारा एक जीव जो किडे खातो २५) पसरलेले; विस्तृत २६) पाण्याने स्वच्छ करणे; धुणे

**उभे शब्द** :- १) साल; वर्ष; शक २) एक प्रकारची दारू ३) दाट झाडी असलेले स्थान ४) पूर्व आणि उत्तर यामधील दिशा ५) ओळख ६) ओढा वगैरेंवर बांधलेला तात्पुरता पूल ९) असंख्य; अगणित; अनंत ११) झाडाची पाने वगैरे; पाचोळा १२) मुसलमान १३) पश्चिम महाराष्ट्रातील एक प्रमुख नदी जिच्यावर विद्युत निर्मित प्रकल्प आहे १६) गोळा करणे; जमविणे १८) उपासाला चालणारा एक तांदूळ २०) पोस्ट; मेल; डाक २१) अधर्म; पातक २३) रस्ता; मार्ग; पथ

### शब्दगंध क्र. ७४२८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स | दा | शि | व | ■ | बा | स | री |
| डा | ■ | र | त | न | बा | व | ■ |
| ■ | व | स्ता | न | ■ | ■ | ल | स |
| पा | ला | ■ | ■ | आ | ■ | त | र |
| र | म | ता | रा | म | ■ | ■ | मा |
| स | त | रा | ■ | दा | ■ | मो | ड |
| नी | ■ | धी | व | र | ■ | ही | ■ |
| स | ती | श | ■ | ■ | क | म | ळ |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : अनुभव हा बाजारातला तो नमुना आहे ज्याच्यासाठी स्वत: खर्ची व्हावे लागते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बराच वेळ हात पाण्यात राहिल्याने सुरकुत्या का पडतात?

पाण्यात बराच वेळ हात किंवा पाय ठेवल्यास बोटांच्या त्वचेवर सुरकुत्या पडणे ही एक नैसर्गिक आणि शास्त्रीय प्रक्रिया आहे. पूर्वी असे मानले जात असे की त्वचा पाणी शोषून घेते, म्हणून सुरकुत्या पडतात. मात्र, नवीन संशोधनानुसार हे चुकीचे आहे.सुरकुत्या का येतात? (शास्त्रीय कारण) हे प्रामुख्याने चेतापेशींच्या नियंत्रणाखाली घडणारे एक 'क्टिव्ह' (सक्रिय) कार्य आहे, केवळ 'पॅसिव्ह' (निष्क्रिय) पाणी शोषून घेण्याची प्रक्रिया नाही. रक्तवाहिन्यांचे आकुंचन : जेव्हा बोटे जास्त वेळ पाण्यात राहतात, तेव्हा त्वचेखालील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात.

रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यामुळे बोटांच्या टोकांवरील त्वचेच्या खालील भागाचा आकार कमी होतो. त्वचा आत ओढली जाणे: त्वचेच्या आतील भागाचा आकार कमी झाल्यामुळे, वरची त्वचा आतल्या बाजूला ओढली जाते, ज्यामुळे सुरकुत्या पडतात.

सुरकुत्या पडणे ही उत्क्रांतीची एक प्रक्रिया आहे. ओल्या वस्तूंना पकडताना सुरकुतलेली त्वचा टायरच्या ट्रेड्ससारखे काम करते. यामुळे ओल्या पृष्ठभागावर चांगली पकड मिळते.

जर हाताच्या नसा खराब असतील, तर पाण्यात कितीही वेळ हात ठेवले तरी सुरकुत्या पडत नाहीत. यावरून सिद्ध होते की ही क्रिया चेतापेशींद्वारे नियंत्रित असते.सेबमचा थर त्वचेवर सेबम नावाचा तेलकट नैसर्गिक थर असतो, जो पाणी आत शिरण्यापासून रोखतो. जास्त वेळ पाण्यात राहिल्याने हा थर धुवून जातो आणि मगच ही प्रक्रिया सुरू होते.

## खोटी स्तुती

एका मोठ्या जंगलात एक कावळा राहत होता. एके दिवशी त्याला गावातून एक छानसा पोळीचा तुकडा मिळाला. तो खूप आनंदी झाला आणि झाडाच्या फांदीवर बसून तो तुकडा खायला लागला.

तेवढ्यात एक चतुर कोल्हा तिथे आला. त्याने कावळ्याच्या तोंडातला तुकडा पाहिला आणि त्याच्या तोंडाला पाणी सुटलं. कोल्ह्याने विचार केला, हा तुकडा मिळवायचा असेल तर काहीतरी युक्ती करावी लागेल.

तो झाडाखाली जाऊन गोड आवाजात म्हणाला, अरे कावळ्या महाराज! तुमचा आवाज खूप सुंदर आहे असं मी ऐकलंय. एक गाणं ऐकव ना!

कावळा थोडा खुश झाला, पण त्याने काही उत्तर दिलं नाही.

कोल्हा पुन्हा म्हणाला, तुमच्यासारखा गोड गाणारा पक्षी या जंगलात नाही. कृपया एकदा गा ना! आता कावळ्याला खूप अभिमान वाटला. त्याने गाणं गाण्यासाठी तोंड उघडलं आणि त्याच्या तोंडातील पोळीचा तुकडा खाली पडला!

कोल्ह्याने लगेच तो तुकडा उचलला आणि हसत म्हणाला, धन्यवाद! गाणं नको, तुकडा मिळाला म्हणजे झालं! कावळ्याला आपली चूक समजली. तो लाजला आणि विचार करू लागला.

बोध : खोट्या स्तुतीला (चापलुसीला) बळी पडू नये. अहंकारामुळे आपण नुकसान करून घेतो.



## जीवन का अमृत (भाग १)

४४. प्रभु एक है और उस तक जाने का रास्ता भी एक है। आपको रास्ता दिखा दिया गया है। एक अनुयायी किसी भी रास्ते का अनुसरण करते हुए प्रारंभिक कदमों में कुछ भ्रमित हो सकता है। पर अगर हम व्यवहारिक दृष्टि से देखें, तो हम पाएंगे कि प्रभु के रास्ते पर एक जैसी प्रवृत्ति रखने वाली चीजें, जल्दी नहीं मिलती कि वह एक ही है।

निपुणता तक जाने वाला रास्ता चक्कर में पार किया जा सकता है, बातें तो नहीं। दूसरों को या समूह को अपनी समझ या अपने नजरिये से परखना या इस प्रकार की और बातें किसी के लिए भी सही नहीं। सभी निपुणता के रास्ते पर हैं और यह किसी के हक में नहीं कि वह दूसरों में गलतियां निकाले।

४५. कितना भाग्यशाली है वह बालक, जो सतगुरु के मजबूत, रक्षक और प्रेममय संरक्षण में पूर्ण विश्वास रखता है, और उसके आगे पूरी तरह

### उनकी सरलता

आत्म समर्पण कर देता है, बालक हो जाता है और दिव्य पिता (सतगुरु) के निर्देशों के अनुसार कार्य करता है। उसकी जिंदगी मधुर हो जाती है, उसकी परेशानियां दूर हो जाती हैं और उसका रास्ता साफ और सरल हो जाता है। आईये, हम सब उसमें (सतगुरु) में पूर्ण विश्वास रखें।

४६. धूम्रपान को आप छोड़ सकते हैं, अगर आप ऐसा चाहें और इसका दृढ़निश्चय करें। जहां चाह, वहां राह। इस आदत को धीरे-धीरे कम करते जाएं और एक दिन आप अपने आप इस बंधन से मुक्त पाएंगे। इसका सबसे आसान तरीका है कि उसे तुरंत छोड़ दें और फिर इस पर पूरी तरह काबू पा लें। गुरु-कृपा आपको इस आदत से छुटकारा दिलाने में हर संभव सहायता करेगी, अगर आप उसकी सलाह मानें। यदि धूम्रपान से परहेज करने पर आपको कोई परेशानी महसूस हो, तो आप होम्योपैथिक दवाई टेबेक्स का सहारा ले सकते हैं, जो कि आपको हर परेशानी से छुटकारा दिला देगा। यह आदत अवश्य ही आपके भजन-निमित्त में बाधा डालती होगी, क्योंकि भजन-अभ्यास में समय देने के बजाय आप धूम्रपान को वरीयता देते होंगे।

४७. यह दुनिया की बात है कि दुनियावी लोग इंसान को गुमराह करने के उपाय में लगे रहते हैं और वे सच्चे जिज्ञासुओं को, अपने अंधभक्त गलत रास्ते से और दुश्मनों से, रास्ते से दूर कर देते हैं, ताकि अपना उल्लू सीधा कर सकें।

एक निराश बच्चे को परमात्मा का रास्ता दिखाना वास्तव में एक महान सेवा है और इसके विपरीत, किसी को सही रास्ते से भटकाना और गुमराह करना, बहुत बुरा कृत्य व पापकारक है। आपका समय रहते हस्तक्षेप करना प्रशंसनीय है, क्योंकि आपने उसे पहले से सावधान कर दिया कि हर चमकने वाली वस्तु सोना नहीं होती।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी: याचं कारण ही जागा तुमच्यासाठी अनुकूल नाही हे तुम्ही स्वीकारलं आहे आणि त्याचा प्रभाव स्वतःवर पडू द्यायचा नाही हेही तुम्ही ठरवलं आहे. आता असा विचार धरून ठेवा. आपण सगळं हे करू शकतो. दृढ संकल्प असणारे कुठेही, कोणालाही बदलू शकतात.

विचारांना प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्र

दोष दिल्याने, तक्रार केल्याने आणि टीका केल्याने आत्म्याची बॅटरी डिस्चार्ज होते आणि आपल्याला मानसिक थकवा जाणवतो. आपल्या थकव्याचं कारण परिस्थितीला दोष देण्यापेक्षा, आपण निर्माण करत असलेल्या भावनांची जबाबदारी स्वतः घ्या.

इतरांशी बोलताना आणि वागताना आपण काळजी घेतो. अशीच काळजी स्वतःशी (विचारांत) संवाद साधतानाही घ्या.

टी.व्ही.वर बातम्या बघताना, खेळ बघताना किंवा इतर कोणतीही दृश्यं बघताना, चालू असलेल्या सीनेप्रमाणे वेगळ्या भावना निर्माण करण्याचा सराव करा. तुमच्या मनाची जबाबदारी घ्या.

एखाद्या परिस्थितीत आपण जेव्हा शांती

### सकारात्मकता

आणि प्रेमाची ऊर्जा निर्माण करतो तेव्हाच आपण ती अनुभवू शकतो. त्या परिस्थितीत आपण जितक्या जास्त नकारात्मक भावना निर्माण करतो, आपल्या मूळ सकारात्मकतेचा अनुभव तितकाच कमी होतो. आणि मग शांती, प्रेम, आनंद आपण बाहेर शोधू लागतो.

आपण जेव्हा संताप आणि तिरस्कार निर्माण करतो तेव्हा इतरांकडून आपल्याला प्रेम आणि आदर मिळत असला तरी आपण तो अनुभवू शकत नाही. कारण आपण नकारात्मक तरंगांनी वेढलेले असतो.

सुरेश ओबेरॉय : मी एक सुविचार वाचला पुनरावृत्ती आहे का? तुम्ही फक्त विचार करण्याच्या, अनुभवण्याच्या आणि 'तुमचं आयुष्य मात्र पुनरावृत्तीची वागण्याच्या पद्धतींची पुनरावृत्ती करता की जुन्या रहाटगाडग्यातून बाहेर यायची तुमची तयारी आहे? स्वतःमध्ये बदल घडवून प्रेमाची अवस्था निर्माण करणं एवढं अवघड आहे का?'

शिवानीदीदी आपण गेली अनेक वर्षं याच पद्धतीने विचार करतोय आणि वागतोय आणि आजही त्याच गोष्टींमधे गुंतून पडलेलो आहोत. ह्या ओळी, सुविचार आपल्याला खूप महत्त्वाचा प्रश्न विचारतो आपलं आयुष्य असंच चालू राहणार का?

जर आपण याच पद्धतीने विचार करत राहिलो, भावना निर्माण करत राहिलो आणि वागत राहिलो तर त्यातून आपल्याला पूर्वीसारखेच परिणाम मिळतील. असं म्हणतात, तुम्ही नेहमी करत होता तेच करत राहता तेव्हा तुम्हाला नेहमी जे मिळत होतं तेच मिळतं. आता ह्यात अजून एका पायरीची भर घालू या. तुम्ही जसा विचार करत आलात तसाच विचार करत राहिलात तर तुम्ही तेच कराल जे तुम्ही नेहमी करत आलात आणि तुम्हाला तेच मिळेल जे तुम्हाला नेहमी मिळत आलं. सुरेश ओबेरॉय कधीकधी माणूस असं काहीतरी बोलतो जे बोलायची त्याची इच्छा नसते. शिवानीदीदी : आपण जो विचार करतो तेच बोलतो.

सुरेश ओबेरॉय : मग आपण जे करायचं ठरवलं आहे ते आपण विसरून का जातो?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मित्र १ : काल मी स्वप्नात करोडपती झालो!
मित्र २ : मग काय केलंस?
मित्र १ : उठलो आणि पुन्हा गरीब झालो

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ खालीलपैकी कोणत्या प्रकल्पास महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी म्हणतात?

– कोयना

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

सर्वात प्रथम बाजारातून भाज्या आणल्यानंतर त्या पाण्याने स्वच्छ धुणे आवश्यक आहे. पावसाळ्यातील दिवसांमध्ये तर पोटॅशियम परमँगनेट पाण्यामध्ये टाकून त्या पाण्याने भाज्या धुवाव्यात. किड लागलेल्या भाज्या आहारामध्ये वापरू नयेत. दोन पाण्यांमध्ये भाज्या स्वच्छ धुतल्यानंतर त्यातील पाणी निथळून घ्यावे. त्यामुळे भाज्यांमधील विकृत जंतू अथवा कृमी निघून जातात. पर्यायाने त्यापासून सूक्ष्म उद्भवणारे रोग होत नाहीत. भाजी स्वच्छ धुतल्यानंतर शक्यतो मोठ्या स्वरूपात कापावी. भाजी शिजविताना ती भाजी बुडेल एवढेच पाणी त्यात घालावे. तसेच पालक, करडई, मेथी या भाज्या शिजविताना पाणी घालण्याची आवश्यकता नसते. भाजी शिजविताना त्यातील अन्नघटक नष्ट होऊ नये म्हणून पातेल्यावर झाकण ठेवावे. भाज्या किंचित मऊ होईपर्यंतच शिजवाव्यात. भाजी शिजविण्यासाठी कधीही ल्युमिनिअमचे भांडे वापरू

### भाज्या

नये. ल्युमिनिअमच्या भांड्यात शिजविलेल्या अन्नातून कण पोटात जाऊन आमाशय, लहान व मोठे आतडे यांच्या आतील श्लेष्मल नाजूक त्वचेला अपाय त्याचे होऊन पचनसंस्थेचे विविध विकार होऊ शकतात. सहसा लोखंडी कढईमध्ये भाज्या शिजवाव्यात. शिजविलेल्या भाजीचे पाणी काढून टाकू नये.

भाजी खूप वेळ शिजवू नये. कारण भाजी जास्त वेळ शिजवली, तर त्यातील पौष्टिक व औषधी गुणधर्म नष्ट होतात. भाजी करताना सहसा त्यांची साल काढू नये. भाजीमध्ये सालीलगतच अनेक जीवनसत्त्वे, पौष्टिक घटक असतात. साल काढल्यामुळे ती निघून जातात. म्हणून सहसा कंदमुळे खोडे, पाने, देठ यांच्यावरील माती व कृमी नष्ट होण्यासाठी खळाळत्या पाण्यात (नळाखाली) भाज्या स्वच्छ धुऊन घ्याव्यात.

एकदा शिजविलेली भाजी गरम व ताजी असतानाच खावी. सहसा फ्रीजमध्ये ठेवलेली भाजी, शिळी भाजी यांचा वापर करू नये. कारण फ्रीजमधील भाजी वारंवार खाण्यात आल्यास वातविकार होण्याची शक्यता असते. सहसा फ्रीजमधील भाजी खाण्याची वेळ आल्यास ती साधारणपणे अर्धा ते एक तास बाहेर काढून ठेवावी.

निरोगी आयुष्य जगण्यासाठी रोज प्रत्येक व्यक्तीने २८० ते ३०० ग्रॅम भाज्या खाणे आवश्यक आहे. त्यामध्ये ५०% पालेभाज्या, २०% कंदमुळे व ३०% फळभाज्या या स्वरूपात भाज्या खाव्यात.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# पितळे डायग्नोस्टिक्स सेंटरचे १५ मे रोजी उद्घाटन

**देशसेवेपासून आरोग्यसेवेपर्यंतचा डॉ. सुजाता जाधव-पितळे यांचा प्रेरणादायी प्रवास**



नगर – भारतीय सैन्य दल आणि भारतीय नौदलात वैद्यकीय अधिकारी म्हणून उल्लेखनीय सेवा बजावत देशसेवेचा सन्मान मिळवलेल्या सर्जन लेफ्टनंट कमांडर डॉ. सुजाता जाधव-पितळे आता अहिल्यानगरमध्ये अत्याधुनिक आरोग्यसेवेचे नवे पर्व सुरू करीत आहेत. पितळे डायग्नोस्टिक्स या आधुनिक व सुसज्ज वैद्यकीय निदान केंद्राचे (पॅथॉलॉजिकल लॅब) उद्घाटन १५ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजता टीव्ही सेंटरजवळील मकासरे हेल्थकेअर शेजारी असलेल्या यशोदीप बिल्डिंग येथे होणार आहे.

या केंद्राचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील आणि सुचिता लक्ष्मण पितळे यांच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी आमदार संग्राम जगताप राहणार आहेत. यावेळी आमदार अक्षय कर्डिले, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, भाजपा जिल्हा समन्वयक विनायक देशमुख, अंबिका महिला बँकेच्या अध्यक्षा भारती शशिकांत आठरे, नगरसेवक अभिनाश घुले, डॉ. अनिल आठरे, डॉ. सतीश सोनवणे, डॉ. विजय पाटील, डॉ. संदीप गाडे, डॉ. अतुल खालकर उपस्थित राहणार आहेत.

डॉ. सुजाता जाधव-पितळे यांनी विळद घाटातील विखे पाटील वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पूर्ण केले. घरातील सामाजिक व देशभक्तीपूर्ण वातावरणामुळे त्यांचा सुरुवातीपासूनच आव्हानात्मक क्षेत्राकडे ओढा होता. त्यामुळे त्यांनी आरोग्य सेवेच्या माध्यमातून देशाची सेवा करण्याचा निर्णय घेतला. भारतीय सैन्य दलात वैद्यकीय अधिकारी म्हणून देशसेवेची वाट निवडली. डेहराडून येथील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये कॅप्टन पदावर सेवा बजावल्यानंतर त्यांनी लखनऊ येथे विशेष सैनिकी वैद्यकीय प्रशिक्षण पूर्ण केले. जम्मू येथील सीमावर्ती भागातील व संवेदनशील क्षेत्रातील मिलिटरी हॉस्पिटलमध्ये त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही रुग्णसेवा केली.

यानंतर भारतीय नौदलात सर्जन लेफ्टनंट कमांडर म्हणून कार्यरत असताना मुंबईतील इंडियन नेव्हल हॉस्पिटल 'अश्विनी' येथे पॅथॉलॉजी विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. या शिक्षणादरम्यान त्यांनी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदकही प्राप्त केले. मुंबईतील अत्याधुनिक नौदल रुग्णालयात कॅन्सर निदान क्षेत्रातील विशेष प्रशिक्षण घेतल्यानंतर त्यांनी नगरमध्ये आधुनिक तपासणी सुविधा उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला.

याशिवाय केंद्रामध्ये अत्याधुनिक 'सिक्स पार्ट सीबीसी ॲनालायझर'सह विविध आधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करण्यात आली आहेत. त्यामुळे रक्त, लघवी व इतर तपासण्यांचे अचूक आणि जलद अहवाल मिळणार आहेत. सर्व तपासण्या स्वतः डॉ. सुजाता जाधव-पितळे यांच्या देखरेखीखाली होणार असल्याने नगरकरांना विश्वासार्ह आणि दर्जेदार आरोग्यसेवा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहे. या उपक्रमासाठी सर्जन कमांडर डॉ. देवदत्त लक्ष्मण पितळे यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. पितळे डायग्नोस्टिक्स मधील अत्याधुनिक तंत्रज्ञान व सुविधांमुळे सर्व रिपोर्ट्स अति जलद व अचूक मिळणार असल्यामुळे क्लिष्ट व बाऐपसी सारख्या पॅथॉलॉजिकल तपासण्यासाठी आता पुण्यामुंबईला जाण्याची गरज भासणार नाही असा विश्वास सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

### महिलांसाठी दिलासादायक 'लिक्विड बेस्ड सायटोलॉजी' तपासणी

पितळे डायग्नोस्टिक्समध्ये नगरमध्ये प्रथमच लिक्विड बेस्ड सायटोलॉजी ही अत्याधुनिक तपासणी सेवा उपलब्ध होणार आहे. महिलांमध्ये वाढत्या प्रमाणात आढळणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यात निदान करण्यासाठी ही तपासणी अत्यंत प्रभावी मानली जाते. मासिक पाळीतील अनियमितता, स्त्रीरोग तसेच विविध गंभीर आजारांचे अचूक निदान या पद्धतीमुळे शक्य होणार आहे. विशेष म्हणजे या तपासण्यांसाठी महिलांना आता पुणे किंवा मुंबई येथे जाण्याची आवश्यकता भासणार नसून सर्व सुविधा अहिल्यानगरमध्येच उपलब्ध होणार आहेत.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आपले चैतन्य जागवावे

"मुसाफिर"
संकलन: दिशान फिचर्स

मुण्डकोपनिषद एक कहाणी सांगते. एक होता शौनक, गावातली प्रसिद्ध व्यक्ती. खूप ऐश्वर्य आणि धनसंपत्ती. पण मनाला नव्हती शांती. ब्रह्मज्ञान हवे म्हणतात. व्यवहारदेखील नीट सांभाळता यावा, असे सांगतात. म्हणून शौनक गेला अंगिरा नावाच्या विख्यात ज्ञानी पुरुषाकडे. संसारातल्या समृद्धीचा विषय निघाला. ब्रह्मज्ञान हवेच होते त्याच्या जोडीला अंगिरा मोठ्या सूचकतेने म्हणाला.

ब्रह्म ही सर्वसमृद्धिसाधक संकल्पना आहे. सर्वांमध्ये व्यक्तीही आलीच नव्हे. प्रत्येक व्यक्ती समृद्ध झाली की सगळी मानवजाती आपोआपच समृद्ध ठरली. मग व्यक्ती मृदुध कशी होईल? बा माणसा तू कोळी पाहिलास? कसा आरंभतो तो त्याचा उद्योग? घेतो का बाहेरून कुणाकडून भांडवल? लावतो का कुणा दुसऱ्यांना भाडोत्र्यासारखे आपल्या कामाला? लुबाडतो का इतर दुबळ्यांना? छे, आपल्याच शरीरातून काढतो आपलाच रस, आपण विणतो आपले जाळीदार विश्व आणि घेतो पुन्हा गिळून आपलेच आपण आपल्याच भरवशावर, आपलेच चैतन्य जागवून. अंगमेहनतीने उभारावा उद्योग. खूप पसरावे उद्योगाचे जाळे आणि त्यात गवसलेले सारे उपभोग्य धन घ्यावे आत साठवून. नको कुण्या दुसऱ्याचे श्रम फुकटाचे, नको गादीवर बसून केवळ हुकूम सोडणे. हेच सन्मानाचे जगणे.

बा माणसा, पण म्हणशील, हे कसे जमणे? परिस्थिती प्रतिकूल. कुणी अर्थसहाय्य करायला पुढे न येणे? मी एकटा काय जोर लावणे? तर बा माणसा, पाहा त्या लवळवत्या वर आलेल्या गवताच्या इवल्याशा पात्याकडे खडकाळ जमीन विपरीत वातावरण, पण मिळविलेच ना त्याने जीवन? टणक जमीन फोडून, दगडाला बाजूला सारून वर आलाय तो वनस्पतीचा अंकुर. कशी ताठ मान करून डुलतोय हवेवर हिरवागार. कुणी घातले आणून त्याला पाणी? केली कधी त्याची मशागत? केवळ आपले चैतन्य जागवून, आत्मविश्वास बाळगून, प्रामाणिकपणे कष्ट करून ते गवताचे पाते पाहा आले कसे वर.





खुद्द माणसा, तुझ्या बालपणीच्या शरीरावर उगवले केस, उठले रोमांच, ते कुणा दुसऱ्यांच्या भरवशावर? आपलाच रस, आपलेच चैतन्य, आपलीच आंतरिक स्फूर्ती. त्यानेच उगवली ही रोमपंक्ती.

तसेच न झिजणाऱ्या, न संपणाऱ्या, क्षीण न होणाऱ्या उत्साहातून, उद्यमातूनच हे समृद्धीचे विश्व निर्माण होते. प्रामाणिक व अथक प्रयत्न, हेच समृद्धीचे समर्थ शास्त्र.

जनाबाईंनी अंतरीची खूण ओळखली. आतली चैतन्यशक्ती जागविली. त्या चैतन्याहून मी नाहीच वेगळी, ही खूणगाठ बांधली. देवाहून मी देवधारी हे दुजेपण विसरून त्या चैतन्याशी एकरूप झाल्या. मग सिद्धी हाती आली. आतला आवाज ऐकावा. विवेकाने तो समजून घ्यावा. आपलाच हेका न धरावा. आत्म्याशी संवाद साधावा. मग यशाचे धनी व्हावे.

**– किशोर गांधी**

# नगरमध्ये १४ मे रोजी छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव



नगर – हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती १४ मे रोजी साजरी होत असून या निमित्ताने नगरमध्ये प्रोफेसर कॉलनी चौकात बसविण्यात आलेल्या महाराजांच्या पुतळ्याला सकाळी १० वाजता अभिवादन केले जाणार आहे. यासाठी शिवशंभू प्रेमी, शहरवासीयांनी उपस्थीत रहावे, असे आवाहन इंजिनिअर सुरेश इथापे यांनी केले आहे.

याबाबत माहिती देताना इथापे यांनी सांगितले की, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती यावर्षी पासून नगरमध्ये व्यापक स्वरुपात साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीनिमित्त प्रोफेसर कॉलनी चौकातील पुतळ्याभोवती महापालिकेच्या वतीने सुशोभीकरण, सजावट, विद्युत रोषणाई केली जात आहे. सकाळी १० वाजता महापौर ज्योतीताई गाडे यांच्यासह महापालिकेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी, नगरसेवक तसेच सर्व शिवशंभू प्रेमी यांच्या उपस्थितीत छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करून त्यांच्या पराक्रम, विद्वत्ता, स्वराज्य प्रेम, निष्ठा आणि बलिदान यांना उजाळा दिला जाणार आहे.

या जयंती उत्सवास सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन इथापे यांनी केले आहे.



### ॲड.अच्युतराव पिंगळे यांना आयकॉन ऑफ अहिल्यानगर पुरस्कार प्रदान

वयाची ८० वर्षे पूर्ण करीत असलेले ॲड. अच्युतराव पिंगळे यांना सहस्त्रचंद्रदर्शन गौरव सोहळ्यात रामजन्मभूमी राम मंदिर, अयोध्या चे कोषाध्यक्ष श्री स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज व विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चे संस्थापक अध्यक्ष बी के डॉ. दीपक हरके यांचे हस्ते माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे आयकॅान ऑफ अहिल्यानगर पुरस्कार प्रदान करून त्यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी ब्रह्माकुमारी मधू दीदी, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, गोविंद गोधाम, बेलापूरचे आचार्य महेश व्यास, ॲड. उज्वल निकम, महापौर सौ. ज्योती गाडे, चंद्रशेखर कदम, ॲड. विश्वासराव आठरे, प्रा. भानुदास बेरड, वसंत लोढा, राजेंद्र चोपडा, राजेंद्र गांधी, राजेंद्र काळे, डी. एम. कुलकर्णी उपस्थित होते.

# जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती

नगर – जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे रुग्णांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी तसेच रुग्णालयातील विविध समस्या व अडचणी तातडीने सोडविण्यास मदत व्हावी या उद्देशाने संनियंत्रण व सल्लागार समिती गठीत करण्यात आली असून या समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार तसेच पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांच्या मंजूर टिपणीनुसार ही नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय डी. घोगरे यांनी दिली.




जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीवर ॲड. लक्ष्मण पोकळे तसेच अशासकीय संस्था प्रतिनिधी राजेश सुरेशलाल परदेशी यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या समितीवर ॲड. लक्ष्मण पोकळे तसेच अशासकीय संस्था प्रतिनिधी राजेश सुरेशलाल परदेशी यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समितीच्या माध्यमातून रुग्णालयातील विविध प्रशासकीय व आरोग्यविषयक बाबींवर समन्वय साधून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. जिल्हा रुग्णालयात विविध विभागांतील अधिकारी समितीमध्ये सहभागी असल्यामुळे किरकोळ अडचणी त्वरित मार्गी लावणे शक्य होणार असून रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच समितीच्या बैठका पालकमंत्री तथा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार असून संबंधित सदस्यांनी प्रत्येक बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या हस्ते ॲड. लक्ष्मण पोकळे यांनी नियुक्तीपत्र स्वीकारले. यावेळी सहाय्यक अधिकारी राहुल साबळे, डॉ. संदीप पोखरे आदी उपस्थित होते.

# हिंदू राष्ट्र व राम राज्याचा जाहीरनामा म्हणजे पसायदान

## स्वामी गोविंददेव गिरी यांचे स्पष्टीकरण; ॲड.अच्युत पिंगळे यांचा सहस्रचंद्रदर्शन गौरव सोहळा व समर्पित गौरव अंकाचे प्रकाशन

नगर – तब्बल आठशे वर्षानंतर वंगभुमी (पश्चिम बंगाल) स्वतंत्र झाला आहे. तेथे भाजपचा नाहीतर हिंदुत्वाचा विजय झाला आहे. राम राज्य स्थापनेच्या दिशेने हे पाऊल आहे. हिंदू राष्ट्र व राम राज्याचा जाहीरनामा ज्ञानेश्वर माऊलींचे पसायदान आहे व त्यातील विवेचन ही हिंदुत्ववाद्यांची प्रेरणा आहे, असे प्रतिपादन श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी यांनी केले. देशाला फुटीचे ग्रहण लागले आहे. प्रांत, भाषा, जाती, संप्रदाय असे भेद करून देशाला तोडण्याचे षडयंत्र दीडशे वर्षापासून सुरू आहे. भारत तेरे टूकडे होंगे अशी भाषा यातूनच येते. त्यामुळेच भारताचे अस्तित्व व सनातन धर्म रक्षणाचे कर्तव्य प्रत्येकाचे आहे, असेही आवाहन त्यांनी केले.



ॲड. अच्युतराव सदाशिव पिंगळे यांचा सहस्र चंद्रदर्शन गौरव सोहळा व त्यांच्या जीवनावरील समर्पित गौरव अंकाचे प्रकाशन येथील माऊली सभागृहात स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते झाले.

अहिल्यानगर येथील ॲड. अच्युतराव सदाशिव पिंगळे यांचा सहस्र चंद्रदर्शन गौरव सोहळा व त्यांच्या जीवनावरील समर्पित गौरव अंकाचे प्रकाशन येथील माऊली सभागृहात स्वामी गोविंददेव गिरी यांच्या हस्ते झाले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्यसभा खासदार व विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम, महापौर ज्योती गाडे, सौ.पिंगळे, माजी आमदार चंद्रशेखर कदम, आचार्य महेश व्यास, मोहन बुवा रामदासी, गौरव समितीचे अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे, स्वागताध्यक्ष वसंत लोढा, उपाध्यक्ष प्रा.भानुदास बेरड, डी.एम.कुलकर्णी, राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा, राजेंद्र काळे उपस्थित होते.

स्वामी गोविंददेव गिरी हे मूळचे अहिल्यानगर जिल्ह्यातील बेलापूर येथील आहेत. या पार्श्वभूमीवर आणीबाणी व त्यापूर्वीच्या जिल्ह्यातील राजकीय व सामाजिक स्थितीवर त्यांनी भाषणात परखड भाष्य केले. दत्ताजी भाले, दामू अण्णा दाते, दत्तोपंत ठेंगडी आदी संघ स्वयंसेवकांच्या संघर्ष व संघ कार्याच्या आठवणींना उजाळा देताना ते म्हणाले, त्या काळात जिल्ह्यात भयंकर स्थिती होती. लाल बावटाची दहशत होती. आणीबाणीत १९ महिने अनेक जण कारागृहात होते. त्यांच्या आयुष्याची वाताहत व्हावी अशी व्यवस्था केली गेली होती. बलिदान वा सती जाणे एकदाच होते, परंतु वारंवार होणारा अपमान व दिल्या जाणाऱ्या त्रासामुळे संघ सेवकांना रोज बलिदानाला सामोरे जात सती जावे लागत होते. अशा सगळ्या पार्श्वभूमीवर ध्येयप्रेरित आपल्या मार्गावर चालत राहतात व म्हणून मोठे होतात. त्यामुळे संघर्षमय जीवन अनुभवलेल्या ॲड. पिंगळे यांचा सत्कार हा तपस्वी जीवन कृतज्ञतेची पावती आहे. असे गौरव उद्गार स्वामी गोविंद देवगिरी यांनी व्यक्त केले.

### आता खरे स्वातंत्र्य : प्रा.राम शिंदे

अयोध्यामध्ये राम लल्लाचे मंदिर झाल्याने आता देशाला खरे स्वातंत्र्य मिळाले आहे. संघ कार्य व भाजपचा आता वटवृक्ष झाला असला तरी अच्युतराव पिंगळे यांच्यासारख्या अनेक पारब्यांनी स्वतःला गाडून घेतले व देशासाठी जीवन समर्पित केल्याने देशात व राज्यात भाजप सरकार आले, असे प्रतिपादन सभापती प्रा. शिंदे यांनी केले. मेहनत, जिद्द व विचारांशी तडजोड न करणाऱ्या ध्येयनिष्ठ व राष्ट्रनिष्ठ व्यक्तींचे जीवन समाजासाठी नेहमी प्रेरणादायी असते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### नगर अर्बन बँक सुरू करण्याचे ध्येय : ॲड. अच्युतराव पिंगळे

गौरव सोहळ्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून ॲड. पिंगळे यांनी नगर अर्बन बँकेतील गैरव्यवहाराशी दिलेल्या लढ्याच्या आठवणी जागवल्या. माझ्याच पक्षाच्या कार्यकर्त्याने केलेल्या भ्रष्टाचाराविरुद्धचा लढा अनेक संघर्षातून मला द्यावा लागला, असे स्पष्ट करताना नगर अर्बन बँक पुन्हा सुरू करणे हेच आपले ध्येय असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी भारतीय वायू दलातील सेवा, नंतर केलेली वकिली, शहरातील राष्ट्रपुरुषांचे पुतळे व त्यामागील इतिहास तसेच संघ कार्यासाठी ९०० गावांना दिलेल्या भेटीच्या आठवणी सांगितल्या.

### इतिहास जाणून घेणार : ॲड. उज्वल निकम

सामान्य माणसासाठीची तळमळ ही आता गुलबाकावलीच्या फुलासारखी दुर्मिळ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयुष्यभर सामान्य व्यक्तींचे हीत जपणारे ॲड. पिंगळे यांचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे, असे गौरवोद्गार व्यक्त करून ॲड. निकम म्हणाले, अहिल्यानगर शहराचा व जिल्ह्याचा इतिहास ॲड. पिंगळे यांच्याकडून मी जाणून घेणार आहे. यापूर्वीच्या जुन्या सामाजिक वातावरणात त्यांच्यासारख्या अनेकांनी केलेला संघर्ष भावी पिढ्यांसाठी दिशादर्शक आहे, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात वसंत लोढा म्हणाले, ॲड. अच्युत पिंगळे यांनी भाजपाचे काम निष्ठेने केले आहे. बँकेच्या हजारो ठेवीदारांना करोडो रुपये मिळवून देण्याकरिता विना मोबदला वकिली केली आहे. एक सर्वसामान्य कार्यकर्ता समाजामध्ये चांगल्या प्रकारे बदल घडू शकतो हे ॲड. पिंगळे यांनी दाखवून दिले आहे. श्री. पिंगळे हे पूर्वीपासूनच प्रसिद्धीपासून दूर राहिले आहेत. त्यांचा कार्याचा गौरव व्हावा. यासाठी समितीने गौरव सोहळा आयोजित केला आहे.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी शुभेच्छा दिल्या. राजेंद्र गांधी, राजेंद्र चोपडा यांनी ॲड. पिंगळे यांनी नगर अर्बन बँकेच्या ठेवीदारांची बाजू न्यायालयात प्रभावीपणे मांडून त्यांना मिळवून दिलेल्या न्यायाच्या आठवणी जागवल्या. तसेच विना मोबदला ७० केसेस लढवून ८५% ठेवीदारांना पैसे परत मिळवून दिले आहेत. तसेच एकाही आरोपीला जामीन मिळू दिला नाही.

गौरव समितीचे अध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे यांनी स्वागत केले. राजेंद्र काळे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. शारदा होशिंग यांनी सूत्रसंचालन केले तर ॲड. पी.व्ही. जोशी यांनी आभार मानले. आमदार संग्राम जगताप यांनीही उपस्थित राहून ॲड. पिंगळे यांचे अभिष्टचिंतन केले.

### 'त्यांच्या'वर पुस्तक लिहा : प्रा. शिंदे

भाजपा आज सत्तेत आहे. अनेक नवे लोक पक्षाशी जोडले गेले आहेत. आमच्या वाडवडिलांपासून आम्ही कसे संघवाले आहोत, हे ते आता आवर्जून सांगतात. परंतु पूर्वी याच मंडळींनी संघ स्वयंसेवक व भाजपच्या लोकांना कसा त्रास दिला हे सर्वांना माहीत आहे. त्यामुळे त्यावर ॲड. पिंगळे यांनी आता एक पुस्तक लिहावे, असे आवाहन सभापती प्रा. शिंदे यांनी यावेळी केले. पक्षात नवे आलेले अनेक जण आम्ही पंचम वर्ष वर्ग शिक्षित असल्याचे सांगतात, परंतु संघात फक्त तृतीय वर्ष वर्ग असतात हेच त्यांना माहीत नाही व यातूनच त्यांचे बेगडी पण स्पष्ट होते, असे प्रा.शिंदे म्हणताच हास्यकल्लोळ व टाळ्यांचा गजर झाला. 'त्यांच्या'वर पुस्तक लिहिण्याच्या प्रा.शिंदे यांच्या आवाहनास ॲड. निकम यांनीही पाठिंबा जाहीर केल्याने त्यालाही टाळ्यांची दाद मिळाली.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी गौरव समितीचे अशोक बकोरे, सदाशिव देवगावकर, विलास कुलकर्णी, अवधूत कुक्कडवाल, विद्याताई पोतदार, बाळासाहेब भुजबळ, दिनकर देशमुख, श्रीमती सुमनताई जाधव आदींनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगर येथील बुद्धिबळपटू आशिष चौधरी बनला कँडिडेट मास्टर



नगर – येथील बुद्धिबळपटू आशिष चौधरी याने बुद्धिबळ खेळात आपल्या आंतरराष्ट्रीय क्लासिकल रेटिंगचा २२०० टप्पा पार केला. त्याच्या या कामगिरीबद्दल जागतिक बुद्धिबळ संघटना फिडे कडून त्यास बुद्धिबळाचा कँडिडेट मास्टर हा मानाचा किताब प्रदान करण्यात आला. महाराष्ट्रात आतापर्यंत जवळपास फक्त ४० ते ४५ खेळाडू कँडिडेट मास्टर होऊ शकले आहेत. त्यात आशिष याचा समावेश झालेला आहे. कु. आशिष चौधरी वय १८ याने आतापर्यंत बऱ्याच राज्यस्तरीय तसेच राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे. आशिष लवकरच आंतरराष्ट्रीय मास्टर तसेच ग्रँडमास्टर होण्यासाठी प्रयत्नशील आहे. आशिष यास आई-वडिलांचे प्रोत्साहन व प्रशिक्षक विशाल गुजराथी व प्रकाश गुजराथी यांचे मार्गदर्शन मिळाले. या यशाबद्दल अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सचिव यशवंत बापट व विश्वस्त पारुनाथ ढोकळे तसेच खेळाडू आणि पालक यांनी त्यास अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सवात राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धेचे आयोजन; २२ मे रोजी न्यू आर्ट्स कॉलेजमध्ये अंतिम फेरी; २५ स्पर्धकांना संधी

नगर – पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३१ मे रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त पालकमंत्री सांस्कृतिक महोत्सव व अहिल्यानगर गौरव दिन अंतर्गत राज्यस्तरीय खुल्या वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेची अंतिम फेरी २२ मे रोजी सकाळी १० वाजता न्यू आर्ट्स कॉलेजच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहात होणार आहे. प्राथमिक फेरीतून निवडलेल्या २५ स्पर्धकांना अंतिम फेरीत सहभागी होता येणार आहे.

स्पर्धेसाठी विषय हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्यावर आधारित असून त्यामध्ये – १) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक कुशल प्रशासक २) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे धार्मिक कार्य ३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : महिला सबलीकरणाचे प्रतीक ४) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रतीक.

स्पर्धा दोन टप्प्यांत होणार असून प्राथमिक फेरीसाठी स्पर्धकांनी निवडलेल्या विषयावर जास्तीत जास्त चार मिनिटांचा स्वतःचा भाषणाचा व्हिडिओ तयार करून १५ मे पर्यंत पाठवणे बंधनकारक आहे. प्राप्त व्हिडिओंचे परीक्षण करून अंतिम फेरीसाठी २५ स्पर्धकांची निवड केली जाईल. ही स्पर्धा वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच १८ वर्षांवरील सर्वांसाठी खुली आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी आपले व्हिडिओ पुष्कर कुलकर्णी (८८३०१ ५९०८३), ऐश्वर्या सागडे (८०८०७२८५३२) आणि चंद्रकांत तागड (९४२२२२१५३२) या क्रमांकावर पाठवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी आकर्षक पारितोषिके ठेवण्यात आली असून प्रथम क्रमांकाला १० हजार रुपये व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकाला ७ हजार रुपये व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकाला ५ हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

तसेच उत्तेजनार्थ प्रथम क्रमांकाला २ हजार रुपये व प्रमाणपत्र, तर द्वितीय क्रमांकाला १ हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

# समता नागरी सहकारी पतसंस्थेकडून सभासदांच्या खात्यात १५ टक्के लाभांश जमा

**सर्वसाधारण सभेत सभासदांनी दाखविला समतावर विश्वास : चेअरमन काका कोयटे**

कोपरगाव - गेल्या ४० वर्षांपासून सभासदांचा विश्वास संपादन करत यशस्वी वाटचाल करणाऱ्या समता नागरी सहकारी पतसंस्थेच्या ४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पुन्हा एकदा सभासदांनी संस्थेवर ठाम विश्वास व्यक्त केला. स्व. यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात झालेल्या या सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा ताळेबंद व नफातोटा पत्रक मांडण्यात आले. यावेळी सर्व सभासदांनी सर्व ठराव हात वर करून मंजुर करण्यात आले. समता नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांनी संस्थेच्या सर्व ठेवी १०० टक्के सुरक्षित असल्याचा विश्वास व्यक्त केला.





स्व. यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात झालेल्या सभेत संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा ताळेबंद व नफातोटा पत्रक मांडण्यात आले. यावेळी सर्व सभासदांनी सर्व ठराव हात वर करून मंजुर करण्यात आले.

सभेत मांडण्यात आलेल्या आर्थिक अहवालानुसार, ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे ११२८ कोटी रुपयांच्या ठेवी असून ८२४ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले आहे. तसेच संस्थेची सुरक्षित गुंतवणूक ३१६ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. जगातील सर्वाधिक सुरक्षित मानल्या जाणाऱ्या सोनेतारण कर्ज योजनेंतर्गत संस्थेने तब्बल ५८५ कोटी रुपयांचे कर्जवाटप केले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. संस्थेला आर्थिक वर्षअखेर १३ कोटी रुपयांचा ढोबळ नफा झाल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

यावेळी बोलताना काका कोयटे म्हणाले, सभासदांनी गेल्या चार दशकांपासून समतावर जो विश्वास ठेवला आहे, तोच संस्थेची खरी ताकद आहे. संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत असून भविष्यातही अधिक पारदर्शक आणि सुरक्षित सेवा देण्याची आम्ही खात्री देतो.

संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद पटेल यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, समता म्हणजे कुबेराचा खजिना आहे. तो कधीही रिकामा होणार नाही. सभासदांच्या आशीर्वादाने तो आणखी भरत राहील.

यावेळी कोपरगाव प्रगत विविध कार्यकारी सोसायटीचे राजेंद्र गिरमे यांनी सांगितले की, प्रगत सोसायटीचे व्यवस्थापन समताने स्वीकारले असून समताच्या सहकार्याने सभासद शेतकऱ्यांसाठी अल्पदरात ड्रोनद्वारे औषध फवारणीचा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सरव्यवस्थापक सचिन भट्टड यांनी वाचून दाखवले. त्यांनी सांगितले की, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे समताने राज्यात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

सेल्फ बँकिंग प्रणालीद्वारे व्हाऊचरलेस व्यवहार, मिस्ड कॉलवर ओटीपीच्या माध्यमातून पैसे मिळण्याची सुविधा यामुळे ग्राहकांचा वेळ वाचत असून व्यवहार अधिक पारदर्शक झाले आहेत. त्यामुळे सभासदांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. तसेच समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीमअंतर्गत ९९.९४ टक्के ठेवीदारांच्या ७० लाख रुपयांपर्यंतच्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

सभेत संस्थेच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त नफा वाटपातून २५ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सप्टेंबर महिन्यात सर्व सभासदांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात येणार असल्याची घोषणाही करण्यात आली.

संचालक संदीप कोयटे यांनी अशोक खरात प्रकरणाबाबत खुलासा करत सर्व व्यवहार कायदेशीर असून सभासदांनी विपर्यस्त वृत्तांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत त्यांनी हात जोडून नतमस्तक होत संचालक मंडळाच्या वतीने सभासदांनी ठेवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानले.

राज्यातील सहकारी पतसंस्था चळवळीला दिलासा देण्याचे काम समता पतसंस्थेने केले असल्याचे आशुतोष पटवर्धन यांनी सांगितले.

शाम क्षीरसागर म्हणाले की, सोनेतारण कर्ज हे सर्वाधिक सुरक्षित कर्जप्रकार असल्याने समताच्या ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित आहेत.

चंद्रकांत शिंदे यांनी सांगितले, सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समताने कोपरगावकरांचा विश्वास संपादन केला असून आजही नागरिकांचा संस्थेवर मोठा विश्वास आहे.

सभेदरम्यान अहिल्यानगर शाखेचे सभासद व अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकरी बँकेचे माजी कार्यकारी संचालक आर. डी. मंत्री यांनी समताच्या कार्याचे कौतुक केले. आमचा अनेक वर्षांपासून समता पतसंस्थेवर विश्वास आहे.

आमच्या ठेवी सुरक्षित असल्याने आम्ही इतरांनाही समतात ठेवी ठेवण्यास प्रोत्साहित करणार आहोत, असे ठेवीदार सी. बी. वक्ते यांनी सांगितले.

सभेस संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंद पटेल, जेष्ठ संचालक जितुभाई शहा, संचालक संदीप कोयटे, अशोक दरक, दीपक अग्रवाल, गिरीष सोनेकर, कचरू मोकळ, भरत अजमेरा, चांगदेव शिरोडे, कायदेविषयक सल्लागार विजय गवांदे, टॅक्स सल्लागार दत्तात्रय खेमनर यांच्यासह सभासद उपस्थित होते. अरविंद पटेल यांनी आभार मानले.

१) १५ टक्के लाभांश थेट खात्यावर जमा संस्थेने सर्वसाधारण सभेत सभासदांना १५ टक्के लाभांश जाहीर केला. विशेष म्हणजे, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वार्षिक सभा संपल्याबरोबर लाभांशाची रक्कम सभासदांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली. सभासदांना मोबाईलवर एसएमएस प्राप्त झाल्याने सभागृहात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

२) सभेदरम्यान सभासद व ठेवीदारांनी संस्थेवर विश्वास दाखवत कोट्यवधी रुपयांच्या नवीन ठेवी जाहीर केल्या.

३) सभेत संस्थेच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त नफा वाटपातून २५ लाख रुपयांची तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सप्टेंबर महिन्यात सर्व सभासदांचा सन्मानपूर्वक सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात येणार असल्याची घोषणाही करण्यात आली.

# ज्ञानसाधना गुरुकुलचा दहावीचा शंभर टक्के निकाल

**कु. दिया कुलट ९५% गुणांसह प्रथम**

नगर - ज्ञानसाधना बहुउद्देशीय व सेवाभावी संस्था, केडगाव संचलित ज्ञानसाधना गुरुकुल क्लासेस यांनी यंदाही दहावीच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे. यामध्ये कु. दिया कुलट हिने ९५ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. प्रथमेश गारुडकर याने ९१ टक्के गुणांसह द्वितीय तर प्रीती रासकर हिने ९०.६० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला.



दहावी बोर्डाच्या परिक्षेत यशस्वी झालेले ज्ञानसाधना गुरुकुलचे विद्यार्थी.

याशिवाय हर्षदा दळवी (९०.४०%), अक्षरा पानसंबळ (९०%), आदित्य शिर्के (९०%), अदिती कोठावळे (९०%), आयुष राऊत (८९%), दिव्या रोकडे (८८%), साक्षी कसबे (८६%), श्रावणी कोळी (८६%), आकांक्षा चिपाडे (८५%), वर्षा शिंदे (८४%), रुचिका पाटोळे (८४%), अनुष्का राऊत (८३%), संस्कृती गावडे (८२%), अर्पिता टिमकरे (८२%), श्रेयस शेलार (८२%), शार्दुल धामणे (८२%), सिद्धांत नरवडे (८२%), अक्षरा घोडके (८१%), रुद्र गाडीलकर (८१%), श्रेयस शिंगोटे (८१%), सार्थक देवकर (८०%), कृष्णा देशमुख (८०%), अमृता येळकर (८०%), श्रावणी मतकर (८०%), सर्वेश अंधारे (८०%), हर्ष मोहीम (८०%) यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार ज्ञानसाधना गुरुकुल तसेच केडगाव ग्रामस्थांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना संस्थेचे संचालक प्रसाद जमदाडे म्हणाले की, ज्ञानसाधना गुरुकुलने १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली असून येथील विद्यार्थी दरवर्षी उत्तम यश संपादन करत आहेत. मागील वर्षीप्रमाणे यंदाही मुलीनेच प्रथम क्रमांक पटकावला ही अभिमानाची बाब आहे. पालकांनी मुला-मुलींना दर्जेदार शिक्षण द्यावे. 'लेक वाचवा, लेक शिकवा' हा संदेश समाजात रुजविणे आवश्यक आहे.

यावेळी शिक्षिका प्रतीक्षा फुलारी, पूर्वा ढोरसकर व नक्षत्रा ढोरसकर उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# थकीत ऊस बिले तात्काळ द्या; अन्यथा तीव्र आंदोलन

नगर - जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित ऊस बिलांचा प्रश्न गंभीर बनला असून चालू २०२५-२६ हंगामातील थकीत ऊस बिले तसेच मागील २०२३-२४ हंगामातील कुकडी सहकारी साखर कारखान्याचे थकीत पेमेंट अद्याप न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्ष मुख्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने शासन आणि प्रशासनाकडे निवेदन देण्यात आले आहे.



जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन देताना अभिजित पोटे आदी.

अभिजीत पोटे यांनी या विषयावर संबंधित सर्व साखर कारखानदार व प्रशासनाला धारेवर धरले आहे. त्यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, शेतकऱ्यांच्या हक्काच्या ऊस बिलासाठी वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून ठोस निर्णय होत नाही. चालू हंगामातील बिले आणि कुकडी कारखान्याचे मागील हंगामातील थकीत पेमेंट तात्काळ दिले नाही तर शेतकरी सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.


निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांकडून शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची देणी प्रलंबित आहेत. यामुळे शेतकऱ्यांना शेतीचा खर्च भागवणे, कर्जफेड करणे आणि पुढील हंगामाची तयारी करणे कठीण झाले आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तातडीची बैठक घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, वेळेत बैठक आयोजित न केल्यास शिवसेना शेतकरी सेनेच्या वतीने जिल्हाभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांच्या या ज्वलंत प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर तोडगा काढावा, अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त केली.

# पी.ए. इनामदार स्कूलचा १० वी बोर्डाचा १०० टक्के निकाल, ९२ टक्के घेऊन तहुरा शेख प्रथम; गुणवत्तेत मुलींचीच बाजी

नगर - मुकुंदनगर येथील इकरा एज्युकेशन अँण्ड वेलफेअर सोसायटी संचलित यस पी.ए. इनामदार इंग्लिश मिडीयम स्कूलचा इयत्ता दहावी (एसएससी) बोर्डाचा निकाल १०० टक्के लागला आहे. इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा शाळेने कायम राखली आहे.



तहुरा शेख | माजीया कुरेशी | माहिन पठाण

यावर्षीच्या दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम यश मिळवले. शाळेच्या गुणवत्ता यादीत तहुरा बशीर शेख ९२.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. माजीया साजिद कुरेशी ९१.८० टक्के घेऊन तिने द्वितीय क्रमांक मिळवला, तर माहिन मोसीन पठाण हिने ९०.६० टक्के गुण प्राप्त करत तृतीय क्रमांकावर स्थान मिळवले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन अब्दुल रहिम खोकर, व्हाईस चेअरमन इंजि. इकबाल सय्यद, सचिव विकार काझी आणि खजिनदार डॉ. खालिद शेख, प्राचार्य युनूस सलीम, डायरेक्टर शब्बीर मोहंमद सी. तसेच उपप्राचार्या फरहाना शेख यांनी गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. तर विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# छावनी परिषद शाळेतील मुलींची नेत्रदीपक कामगिरी

भिंगार - छावनी परिषदेच्या नूतन माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींनी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एस.एस.सी.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा लौकिक उंचावला आहे. विशेष म्हणजे, शाळास्तरावरील प्रथम तीनही क्रमांक मुलींनी पटकावत नेत्रदीपक कामगिरी केली आहे.



श्रावनी शेलार | वैष्णवी खुरपे | आकांक्षा परदेशी

यामध्ये श्रावणी अशोक शेलार हिने ९२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला. वैष्णवी विश्वेश खुरपे हिने ९१.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर आकांक्षा विठ्ठल परदेशी हिने ८९.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे.

यंदा शाळेचा एकूण निकाल ८६ टक्के लागला असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण यशामुळे शिक्षक व पालकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रियंका पोकळे, संध्या पाटकुळकर, महेश भगत, वर्षा सोनवणे व संध्या खोगरे आदी शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल छावनी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी, मनोनित सदस्य वसंत राठोड, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा मीरा आल्हाट तसेच मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# बेरोजगार युवक-युवतींसाठी ४५ दिवसीय मोफत व्यावसायिक प्रशिक्षण कार्यशाळा

**प्रशिक्षणानंतर त्वरित रोजगाराची संधी; १४ मेपर्यंत ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन; माय भारत व प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचा उपक्रम**

नगर - जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींसाठी कौशल्याधारित प्रशिक्षणासह रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या माय भारत आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन संचलित प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या संयुक्त विद्यमाने ४५ दिवसांच्या मोफत कौशल्य प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.



या उपक्रमांतर्गत प्लंबिंग मल्टी स्किल तसेच सीएनसी मशीन ऑपरेटिंग या क्षेत्रांमध्ये प्रशिक्षण दिले जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर युवक-युवतींना रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. बेरोजगार तरुणांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन माय भारतचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष आणि प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या व्यवस्थापक दिवाकर भोयर यांनी केले आहे.

विशेष म्हणजे हे दोन्ही प्रशिक्षण कोर्स निवासी स्वरूपाचे असून, प्रशिक्षणादरम्यान राहण्याची व जेवणाची संपूर्ण व्यवस्था आयोजकांकडून करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्यही मोफत पुरविण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील युवक-युवतींनाही या प्रशिक्षणाचा लाभ घेणे सोपे होणार आहे.

या प्रशिक्षणासाठी किमान शैक्षणिक पात्रता दहावी उत्तीर्ण अशी ठेवण्यात आली असून, निवडलेल्या कोर्सनुसार पात्रता निश्चित केली जाणार आहे. अर्जदारांचे वय १८ ते ३० वर्षांदरम्यान असणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी मार्कशीट, आधार कार्ड, टी.सी. आणि सहा पासपोर्ट आकाराचे फोटो आवश्यक राहणार आहेत.

प्रशिक्षणाचे आयोजन नगर-पुणे रोडवरील स्माईल स्टोन हॉटेलजवळ, कामरगाव (ता. नगर, जि. अहिल्यानगर) येथे करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणीची अंतिम तारीख १४ मे निश्चित करण्यात आली आहे. जागा मर्यादित असल्याने प्रथम नोंदणी करणाऱ्यांना प्राधान्य दिले जाणार आहे.

या कार्यशाळेत अनुभवी व प्रशिक्षित शिक्षकांकडून प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले जाणार आहे. तांत्रिक कौशल्यांसोबतच व्यक्तिमत्व विकास, संवाद कौशल्य आणि व्यावसायिक शिस्त यांसारख्या बाबींवरही विशेष प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यास या उपक्रमाची मोठी मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. अधिक माहितीसाठी श्रीकृष्ण मुरकुटे (मो. ९२२५७७६९९५) यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# धनादेश अनादर प्रकरणी कर्जदाराला सहा महिने कारावास; ७० हजार दंड

नगर - कर्जाच्या थकबाकीपोटी दिलेला धनादेश बँकेत न वटल्याने कर्जदाराला न्यायालयाने सहा महिने कारावास आणि ७० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी प्रतिभा ए. पाटील यांनी हा आदेश दिला.

अमरदिप वामनराव निकाळजे (रा. के. व्ही. एम. आय. आर. सी. १, बी ७३, सोलापूर रोड, अहिल्यानगर) यांनी सन २०१३ मध्ये महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, भिंगार यांचेकडून ४० हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. या कर्जाच्या थकबाकीच्या परतफेडीसाठी निकाळजे यांनी पतसंस्थेला ४६ हजार रुपयांचा धनादेश दिला होता. मात्र, हा धनादेश बँकेत सादर केला असता तो खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे अनादरीत (बाऊन्स) झाला.

धनादेश अनादरीत झाल्याने महेश नागरी सहकारी पतसंस्थेने आरोपी अमरदिप निकाळजे यांच्याविरुद्ध निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् अ‍ॅक्ट १८८१ च्या कलम १३८ अन्वये न्यायालयात धाव घेतली होती. या खटल्याची सुनावणी अतिरिक्त मुख्य न्याय दंडाधिकारी प्रतिभा ए. पाटील यांच्यासमोर झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले तसेच आरोपीला ६ महिने साध्या कारावासाची व फिर्यादी पतसंस्थेला ७० हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले. जर आरोपीने ही रक्कम न भरल्यास त्याला आणखी ३ महिने कारावास भोगावा लागेल, असेही या आदेशात म्हटले आहे. या खटल्यामध्ये फिर्यादी महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने अ‍ॅड. आनंद आर. फिरोदिया यांनी प्रभावीपणे बाजू मांडली.

# अधिकमासनिमित्त १७ ते १९ मे दरम्यान राजेंद्र टाक यांच्या 'रामकृष्णहरी' या त्रिदिन संगीत कथासोहळ्याचे आयोजन

नगर - संत शांतानंदमहाराज आणि महादेवमहाराज काळे यांचे समाधिस्थान असलेल्या पारनेर तालुक्यातील रायतळे येथील आनंदाश्रममध्ये 'रामकृष्णहरी' या त्रिदिन संगीतकथा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अधिकमासनिमित्त आयोजित या संगीतकथा सोहळ्याचे कथाअभ्यासक तथा गायक वक्ते राजेंद्र टाक हे कथाप्रवक्ते आहेत. १७ ते १९ मे या दरम्यान रोज सायंकाळी ७:३० ते ९:३० या वेळेत ही कथा होणार असून, महाराष्ट्रातील या पहिल्या आगळ्यावेगळ्या त्रिदिन भक्ती सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन हभप राघवानंद महाराज यांनी केले आहे.



श्री. टाक हे पहिल्या दिवशी प्रभू श्री रामचंद्र, दुसऱ्या दिवशी श्रीकृष्ण लीला आणि तिसऱ्या दिवशी पांडुरंग परमात्मा व संत महात्म्य विदित करणार आहेत. भगवंताच्या या तिन्ही रूपांचे दर्शन भाविकांना होणार आहे. दररोज कथेनंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योजक बापूसाहेब डोके, अ‍ॅड. शिवजीत डोके व गणेश काळे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कथा सोहळ्यास प्रारंभ होईल. आनंदाश्रम, रायतळे (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) येथे होणाऱ्या या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी रायतळे आनंदाश्रमाचे सर्व साधकवृंद विशेष परिश्रम घेत आहेत.

# संगमनेर व पुण्यामध्ये मोफत मराठा वधुवर परिचय मेळावे

**जगदंब फाउंडेशन अंतर्गत मराठा सोयरीक संस्थेचे आयोजन**

नगर - जगदंब फाउंडेशन अंतर्गत मराठा सोयरीक संस्थेने संगमनेर व पुणे येथे मोफत मराठा वधू वर परिचय मेळावा आयोजित केले असल्याची माहिती मराठा सोयरीक संस्थेच्या संचालिका जयश्री अशोक कुटे व डॉ.संजय आंबरे यांनी दिली आहे.

हे मेळावे नेहमीप्रमाणे मोफत असून १०८ वा मेळावा अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथे खांडेश्वर सांस्कृतिक भवन, श्री क्षेत्र खांडगाव, तालुका संगमनेर जिल्हा अहिल्यानगर येथे २१ मे रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. वधु वर पालकांनी या मेळाव्यास सहभागी व्हावे असे आवाहन आंबेगाव तालुका राष्ट्रवादीचे सरचिटणीस गणपत ढेरंगे, जगदंब फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश लंघे, रमेश लहानभाऊ गुंजाळ, प्रा. राजाराम मुंगसे, अशोक कुटे, प्रकाश जोंधळे, श्रीकांत बिडवे, आदित्य घाटगे, गणेश कवडे, गोरक्षनाथ पटारे, मनोज सोनवणे, अनिल शेजूळ, नानासाहेब दानवे, पारुनाथ ढोकळे, मोहन हेलकुटे, योगेश पाटील नाशिक, वैभव वडजे व खांडेश्वर देवस्थान ट्रस्ट यांच्यावतीने करण्यात आले आहे.

पुढील १०९ वा मेळावा पुणे जिल्ह्यात आंबेगाव तालुक्यात पिंपळगाव घोडे येथे गीतमाला लॉन्स मध्ये २४ मे रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या सर्व मेळाव्यात अनेक उच्चशिक्षित मुला मुलींची स्थळे बघायला मिळणार आहेत. विविध भागातून वधु वर पालक उपस्थित राहणार आहेत. आजकाल आपले नातेवाईक मित्रपरिवार यांना वेळ मिळत नसल्यामुळे कोणीही स्थळ दाखवण्यात आता मदत करत नाही. म्हणून अशा वधू वर मेळाव्यांची गरज पडत आहे. मराठा सोयरीक संस्थेने आतापर्यंत १०७ यशस्वी वधू वर मेळावे मोफत घेतले आहेत. या संस्थेकडून आतापर्यंत ५००० पेक्षा जास्त लग्न पार पडलेले आहे. त्यापैकी ५७८ लग्न हे विधवा, विदुर, घटस्फोटीत यांचे पार पडलेले आहेत. धर्मादाय कार्यालयात नाव नोंदणी केलेली शासनमान्य अशी ही संस्था आहे.

या मेळाव्यासाठी वधू- वरांनी स्वतः २ बायोडाटा, आधारकार्ड झेरॉक्स घेऊन पालकांसह येणे बंधनकारक आहे. अनेक वेगवेगळ्या तालुक्यातील व वेगवेगळ्या जिल्ह्यातील सर्व प्रकारचे स्थळे या ठिकाणी बघायला मिळणार आहेत. जे मेळाव्यात येऊ शकत नाही त्यांनी अधिक माहितीसाठी ८८४७७२४६८० या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन संस्थेने केले आहे

# कॅलिडोस्कोप

## रेल्वेचा मालक शेतकरी?



टाटा, बिर्ला, अंबानी, अदानी यांच्या मालकीची विमाने, जहाजे आणि मेट्रो असली तरी रेल्वे मात्र त्यांच्या मालकीची होऊ शकली नाही. मात्र ही किमया काही काळासाठी का होईना, एका शेतकऱ्याने करून दाखवली आहे. रेल्वेच्या चुकीमुळे चक्क शेतकरी संपूर्ण ट्रेनचा मालक झाला.


तसेही भारतात अनेकदा विचित्र घटना पाहायला मिळतात. कधी कुणाचा फोटो दुसऱ्याच्या नावाने पेस्ट केला जातो तर कधी नावातच घोळ होतो. पण रेल्वेच्या चुकीमुळे एका शेतकऱ्याला चक्क स्वतः ची ट्रेन मिळाली. रेल्वे ही तुमची संपत्ती असल्याची अशी घोषणा अनेकदा केली जात असली तरी प्रत्यक्षात तुम्ही तिचे मालक होत नाहीत कारण रेल्वे भारत सरकारच्या मालकीची आहे. मात्र संपूर्णनाम सिंग या शेतकऱ्याने काही काळ हा होईना, रेल्वेची मालकी मिळवली होती. पंजाबमधील लुधियाना येथील कटाना गावातील तो एक साधा शेतकरी होता. तोच दिल्लीहून अमृतसरला जाणाऱ्या स्वर्ण शताब्दी एक्सप्रेस ट्रेनचा मालक बनला होता.

कसे घडले?

२००७ मध्ये लुधियाना-चंदीगड मार्ग टाकण्यासाठी रेल्वेने शेतकऱ्यांकडून जमीन खरेदी केली होती. तेव्हा रेल्वेने संपूर्णनाम सिंह यांची जमीन २५ लाख रुपये प्रति एकर या दराने संपादित केली. पण काही दिवसांनी रेल्वेने जवळच्या गावात एवढ्या मोठ्या जमिनीसाठी ७१ लाख रुपये प्रति एकर दिल्याचे संपूर्ण सिंह यांना कळले. मग या दुटप्पीपणाविरोधात ते कोर्टात पोहोचले. सुनावणीत न्यायालयाने नुकसानभरपाईची रक्कम २५ लाखांवरून ५० लाख रुपये करण्याचे आदेश दिले; मात्र नंतर ती वाढवून १.४७ कोटी इतकी करण्यात आली. न्यायालयाने रेल्वेला २०१५ पर्यंत संपूर्णनाम सिंगला संपूर्ण पैसे देण्याचे आदेश दिले. परंतु रेल्वेने त्यांना केवळ ४२ लाख रुपयेच दिले. उरलेली रक्कम देण्यात रेल्वे अपयशी ठरली होती. त्यानंतर जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जसपाल वर्मा यांनी लुधियाना रेल्वे स्थानकावरच ट्रेन थांबवून तिचा ताबा सिंग यांना देण्याचा आदेश दिला. न्यायालयाच्या आदेशानंतर सिंग स्टेशनवर पोहोचले आणि अमृतसर स्वर्ण शताब्दी एक्स्प्रेस ताब्यात घेऊन तिचे मालक झाले. मात्र नंतर रेल्वे अभियंत्याने न्यायालयाच्या आदेशाने ट्रेन सोडवली आणि पुन्हा तिचा ताबा मिळवला.

## चार दिवसच काम!

आजकाल धावपळीच्या जीवनात कामाचा ताण इतका वाढला आहे, की लोकांना स्वत:साठी वेळ काढणे कठीण झाले आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत ऑफिस आणि जबाबदारीत अडकलेले लोक नेहमीच थकवा आणि तणावाचा सामना करत आहेत. अशात कोणी आठवड्याचे चार दिवस काम करा आणि उर्वरित दिवस स्वत:ला द्या म्हटले तर! हे स्वप्नवत वाटत असेल; मात्र ही कल्पना नाही. अनेक देशात हे एक नवे 'वर्क मॉडेल' बनले आहे.




'फोर -डे वर्क वीक'चा अर्थ कर्मचाऱ्यांना आठवड्यातील पाच दिवसांऐवजी केवळ चार दिवस काम करायचे असते. यात एक खास '१००-८०-१००' मॉडेल आत्मसात केले जाते. म्हणजे कर्मचाऱ्यांना शंभर टक्के वेतन मिळते. ते ८० टक्के वेळ काम करतात आणि मात्र त्यांच्याकडून शंभर टक्के उत्पादन क्षमतेची आशा केली जाते. या मॉडेलचा मुख्य हेतू कर्मचाऱ्यांनी कमी वेळेत चांगले काम करावे आणि त्यांना खासगी जीवनासाठीदेखील पुरेसा वेळ मिळाला.

या वर्क कल्चरची सुरुवात युरोपातून झाल्याचे म्हटले जाते. बेल्जियमसारख्या देशांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना चार दिवस काम करण्याचा अधिकार दिला. याशिवाय पोर्तुगाल, स्पेन आणि फ्रान्ससारख्या देशातही या मॉडेलला ट्रायल वा पायलट प्रोजेक्टच्या रुपात स्वीकारण्यासाठी काम करत आहेत. या देशांचे मानने आहे, की यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढते आणि ते जास्त आनंदी राहतात. आता हा ट्रेंड केवळ युरोपापर्यंत मर्यादित राहिलेला नाही. आशियाई देशातही वेगाने पसरत आहे. जपानसारख्या देशाचे सरकारदेखील या मॉडेलला प्रोत्साहन देत आहे. तसेच फिलीपीन्समध्ये ऊर्जा वाचवण्याच्या उद्देशाने सरकारी कर्मचाऱ्यांना 'फोर डे वर्क वीक' लागू केलेला आहे. यावरुन हे स्पष्ट होते, की वेगवेगळ्या कारणाने का होईना; परंतु हे मॉडेल जगभर आपलेसे केले जात आहे.

अनेक रिसर्च आणि रिपोर्ट्समध्ये हे पुढे आले आहे, की कर्मचाऱ्यांना आठवड्याचे चार दिवस काम करायचे असते, तेव्हा त्यांची उत्पादकता वाढताना दिसते. कमी वेळात काम पूर्ण करण्याच्या कारणाने जास्त फोकस आणि एनर्जीसोबत आपल्या टास्कला चांगल्या प्रकारे पूर्ण केले जाते. यासोबत दीर्घकाळ सतत काम केल्याने येणारा तणाव आणि बर्नआऊटदेखील बऱ्याच प्रमाणात कमी होतो. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य चांगले रहाते. अनेक कंपन्यांचा अनुभव हेच सांगतो, की जेव्हा कर्मचाऱ्यांना काम आणि खासगी जीवन यात संतुलन बनवण्याची संधी मिळते, तेव्हा ते जास्त आनंदी आणि संतुष्ट राहातात. याचा थेट परिणाम त्यांच्या कामाच्या गुणवत्तेवर थेट होतो. ते जास्त क्रिएटिव्ह आणि जबाबदारीने काम करतात. त्यामुळे कंपन्यांची कामगिरी चांगली होते आणि त्यांच्या एकूण उत्पन्नात चांगली वाढ पाहायला मिळते.

## ट्रोलिंगनंतर गुणवत्तेतून उत्तर



दोन वर्षांपूर्वी दिसण्यावरून 'सोशल मीडिया'वर होणाऱ्या विखारी टीकेला धीराने सामोरे जाणारी उत्तर प्रदेशची कन्या प्राची निगम हिने पुन्हा एकदा आपल्या यशाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. २०२४ मध्ये दहावीच्या परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या प्राचीने २०२६ च्या १२ वीच्या (इंटरमीडिएट) निकालातही ९१.२ टक्के गुण मिळवून शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे.

प्राची निगमने दहावीच्या परीक्षेत ९८.५ टक्के गुण मिळवून उत्तर प्रदेश बोर्डात अव्वल स्थान पटकावले होते. तेव्हापासूनच तिच्यावर लोकांच्या नजरा होत्या. बारावीच्या निकालानंतर हे स्पष्ट झाले आहे, की प्राचीने केवळ एकदाच यश मिळवले नाही, तर तिने आपले शैक्षणिक सातत्य कायम राखले आहे. पाचशेपैकी ४५६ गुण (९१.२ टक्के) मिळवून तिने पुन्हा एकदा सिद्ध केले, की कठीण परिश्रम आणि लक्ष केंद्रित केल्यास यश हमखास मिळते. प्राचीने विज्ञान शाखेतून परीक्षा दिली असून तिची गणितावरील पकड किती मजबूत आहे, हे तिच्या गुणांवरून स्पष्ट होते. गणितात तिला शंभरपैकी तब्बल ९९ गुण मिळाले आहेत. एका गुणाने तिची शंभरीची धाव रोखली असली, तरी गणितातील तिचे हे यश राज्यात चर्चेचा विषय ठरत आहे. तांत्रिक विषयांकडे असलेला तिचा कल या गुणांवरून स्पष्टपणे दिसून येतो.

२०२४ मध्ये प्राचीचा फोटो व्हायरल झाला, तेव्हा तिच्या मिशीमुळे तिला प्रचंड ट्रोल करण्यात आले होते. यशाच्या आनंदापेक्षा टीकेचा सामना तिला जास्त करावा लागला होता; मात्र प्राचीने त्याकडे दुर्लक्ष करत 'देवाने मला जसे घडवले आहे, त्यात मी समाधानी आहे' असे म्हणत आपला मार्ग निवडला. आज बारावीच्या निकालाने त्या सर्व टीकाकारांची तोंडे पुन्हा एकदा बंद केली आहेत.

प्राचीने आपल्या यशाचे श्रेय आई-वडिलांना आणि कठोर परिश्रमांना दिले आहे. तिला भविष्यात एक यशस्वी इंजिनीअर व्हायचे आहे. सध्या ती 'जेईई'ची तयारी करत असून तिला देशातील नामांकित आयआयटी संस्थेत प्रवेश मिळवायचा आहे. इंग्रजी विषयात तिचे गुण कमी येण्यामागचे कारण तिने स्पर्धा परीक्षेच्या तयारीवर दिलेला जास्त भर असल्याचे सांगितले आहे. प्राचीची ही कहाणी केवळ गुणांची नाही, तर मानसिक धैर्याची आहे. ज्या वयात मुले 'सोशल मीडिया'वरील कमेंट्समुळे नैराश्यात जातात, त्या वयात प्राचीने त्या नकारात्मकतेला आपल्या यशाच्या शिडीत रूपांतरित केले.

## माकडाला कॉलेजमध्ये नोकरी!

उत्तर प्रदेशातील अलीगडमधल्या डीएस पदवी कॉलेजमध्ये 'गोलू' नावाच्या माकडाला अधिकृतपणे सुरक्षा रक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. काही काळापूर्वीपर्यंत या कॉलेजमध्ये माकडांचा अक्षरशः सुळसुळाट होता. माकडे विद्यार्थ्यांच्या हातातील खाणे हिसकावून घ्यायची, अचानक हल्ले करायची आणि अनेकदा वर्गात घुसून पुस्तके, वह्या फाडून टाकायची. त्यामुळे शिकण्याच्या वातावरणावर परिणाम होत होता आणि विद्यार्थ्यांमध्ये सतत भीतीचे वातावरण होते. कधी थेट हल्ला होईल हे सांगता येत नव्हते. विशेषतः मुलींना आणि नव्या विद्यार्थ्यांना खूप भीती वाटायची. अनेक वेळा विद्यार्थी आपला मार्ग बदलून वर्गात जायचे किंवा एकटे जाणे टाळायचे.

यामुळेच कॉलेज प्रशासनाने 'गोलू' नावाच्या माकडाला अधिकृतपणे सुरक्षा रक्षक म्हणून नेमले. या कल्पनेमुळे संपूर्ण कॅम्पसमधील वातावरणच बदलले आहे. सुमारे दोन वर्षांपूर्वी हा प्रयोग सुरू करण्यात आला आणि 'गोलू' कॅम्पसमध्ये दाखल झाला. गोलू हे सुमारे १२ वर्षांचे प्रशिक्षित माकड आहे. त्याला दरमहा १२ हजार रुपये मानधन दिले जाते. तो सकाळी आठ ते संध्याकाळी पाच या वेळात काम करतो. या वेळेत तो कॅम्पसच्या विविध भागात गस्त घालत राहतो. 'गोलू' दिसताच इतर माकडे तिथून पळ काढतात. त्यामुळे त्याच्या केवळ उपस्थितीनेच समस्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

कॉलेज प्रशासन गोलूची विशेष काळजी घेते. त्याच्या आहारात वांगी, पपई, बटाटे, टोमॅटो आणि रोटी यांचा समावेश असतो. दुपारच्या जेवणात त्याला फळे दिली जातात. त्याचे राहण्याचं ठिकाणही कॅम्पसमध्येच आहे, त्यामुळे तो सतत उपलब्ध असतो.

आज गोलू विद्यार्थ्यांचा आवडता साथीदार बनला आहे. विद्यार्थी त्याच्यासोबत फोटो काढतात, व्हिडीओ बनवतात आणि 'सोशल मीडिया'वर शेअर करतात. अनेक जण त्याला कुटुंबातील सदस्यासारखेच मानतात. कॉलेजचे प्राचार्य डॉ. मुकेश भारद्वाज यांच्या मते, या उपक्रमामुळे कॅम्पसमधील माकडांचा उपद्रव जवळपास पूर्णपणे थांबला आहे. विद्यार्थ्यांना आता सुरक्षित आणि निर्धास्त वातावरण मिळत आहे.



## 'एआय' मुळे रुग्णाचा पुनर्जन्म

ही गंभीर आजार असणाऱ्या एका व्यक्तीची कहाणी आहे. पण 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या मदतीने उपचार केल्याने त्याचा जीव वाचला. वर्षभरापूर्वी अमेरिकेतील जोसेफ कोट्स यांची अवस्था इतकी वाईट झाली होती, की डॉक्टरांनी त्यांना एकच प्रश्न विचारला. तो होता, तुम्हाला घरी मरायला आवडेल की रुग्णालयात? परंतु एका 'एआय' मॉडेलने थेरपी आणि औषधांचे सूत्र तयार केले आणि त्यामुळे कोट्स यांना नवीन जीवन मिळाले.

३७ वर्षीय कोट्स वॉशिंग्टनमधील रेंटनमध्ये राहतात. अनेक महिन्यांपासून ते 'एचआयव्ही सिंड्रोम' नावाच्या रक्ताच्या विकाराशी झुंज देत होते. या आजारामुळे त्यांचे मूत्रपिंड जवळजवळ बंद झाले. दर काही दिवसांनी पोटातून लिटरभर पाणी निघत असे. त्यामुळे प्रकृती इतकी खालावली होती की, स्टेम सेल प्रत्यारोपणासारखे उपचारही अशक्य होते.



हार नाही मानली

कोट्स म्हणतात, इतका त्रास असला तरी मी हार मानली होती. मला वाटले की, मृत्यू जवळ आला आहे. परंतु मैत्रीण तारा थिओबाल्डने फिलाडेल्फियाचे डॉक्टर डेव्हिड फेगेनबॉम यांना एक ई-मेल पाठवला. त्यानुसार ताराची भेट डॉ. फेजेनबॉम यांच्याशी झाली. दुसऱ्याच दिवशी डॉ. फेगेनबॉम यांनी कोट्स यांना केमोथेरपी, इम्यूनोथेरपी आणि स्टिरॉइड्सचे अनोखे संयोजन वापरण्याचा सल्ला दिला. हे सूत्र यापूर्वी कधीही एचआयव्ही सिंड्रोमच्या उपचारांसाठी वापरले गेले नव्हते. मात्र त्याच्या वापराने अवघ्या एका आठवड्यात त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होऊ लागली. चार महिन्यांनंतर ते स्टेम सेल प्रत्यारोपणासाठी तयार झाले आणि आता ते पूर्णपणे बरे होत आहेत. हा चमत्कारिक उपचार डॉक्टरांचा नव्हता तर 'एआय' मॉडेलने शोधून काढलेले ते संयोजन होते.

फॉर्म्युला कसा तयार झाला?

डॉ. फेजेनबॉम स्वत: कॅसलमॅन नामक रोगाने (रोगप्रतिकारक शक्तीशी संबंधित एक दुर्मिळ विकार) ग्रस्त होते. मात्र 'सिरोलिमस' नावाच्या जुन्या औषधाने त्यांनी आपले प्राण वाचवले. या अनुभवानंतरच त्यांनी 'एव्हरी क्योर' नावाचा प्रकल्प सुरू केला. त्यात 'एआय' च्या मदतीने ४,००० औषधे आणि १८,५०० रोगांमधील संबंध शोधले गेले. वैद्यकशास्त्राला ड्रग रिप्युरिंग नवीन नाही, परंतु 'एआय' ने ते अधिक वेगवान आणि अधिक प्रभावी उपचार केले जातात असे या तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळेच याच तंत्राने त्यांनी जोसेफ कोट्स यांच्यासाठी औषध तयार केले.

नवी उमेद

-'एआय'च्या या यशामुळे एका रुग्णाचे प्राण वाचलेच खेरीज तंत्रज्ञान आणि विज्ञान यांनी मिळून अशक्य मानल्या जाणाऱ्या आजारांवरही उपचार शोधू शकतात हे सिद्ध झाले. हा आशेचा किरण असून नजिकच्या भविष्यात तो वैद्यकीय क्षेत्रात मोठे आणि महत्त्वपूर्ण बदल घडवून आणू शकतो.


## तारे झाले कमी!

गेल्या काही दिवसांपासून काही खगोलीय घटनांमुळे शास्त्रज्ञ चिंतेत आहेत. त्यांनी भारताच्या आकाशातील ताऱ्यांचं निरिक्षण केले आहे. आकाशातील तारे कमी झाल्याचा दावा करण्यात येत आहे. आकाशातील कोणता राक्षस या ताऱ्यांना गिळत आहे, याची चर्चा होत आहे. शास्त्रज्ञांनी या घटनेविषयी धक्कादायक कारणे पुढे केली आहेत.

पूर्वी गावात अथवा छोट्या शहरात रात्रीच्या वेळी आकाश अगदी निरभ्र, स्वच्छ आणि ताऱ्यांनी उजळलेले दिसायचे. असंख्य तारे लुकलुकत असलेले दिसायचे. आता शहरातील तीव्र प्रकाश आणि प्रदूषणामुळे आकाश तितके स्वच्छ उरलेले नाही. आकाश अस्पष्ट आणि अंधुक दिसते. दिल्ली, मुंबईसारख्या बड्या शहरांमधील स्थिती तर यापेक्षा अधिक वाईट आहे. आता आंधारून आल्यानंतरही पूर्वी इतके तारे आकाशात नजरेस पडत नाही. लहान मुलांना तर आकाशातील लुकलुकणाऱ्या ताऱ्यांचे आकर्षण कमीच झाले आहेत.

लद्दाख येथील हॅनले आणि महाराष्ट्रातील पेंच येथील अत्यंत डार्क स्काय रिझर्व्ह भागातून आकाश निरभ्र, स्वच्छ दिसते. कारण इथे काळोख पसरलेला असतो. इथून आकाशगंगा अगदी स्पष्ट दिसते. तिचा मनमोहकपणा मनाला तजेला देतो. आकर्षित करतो. काही दिवसांपूर्वी देशातील अनेक भागातून अशीच स्पष्ट आकाशगंगा दिसत होती. अनेक तारे न्याहळता येत होते. आकाश इतके चमकदार होते, की त्याचे प्रतिबिंब नदी, धरणे, तलावाच्या पाण्यात जणू परावर्तीत होण्याचा भास होत होता.

तारे गायब होण्यामागील सर्वात मोठे कारण कृत्रिम प्रकाश हे आहे. लाईट, स्ट्रीट लाईट यामुळे आकाशातील ताऱ्यांचा प्रकाश झाकोळून जातो. या प्रकाशामुळे आकाश अंधुक होते. हवेतील धूळ, प्रदूषण यामुळे तर आकाशातील सौंदर्य पृथ्वीवरील माणूस हरवत चालला आहे. चंद्र आणि चांदण्यांना धरून अनेक गीते आणि गजलांनी आपल्या मनाची तृप्ती होते; पण ज्यावर हे काव्य तयार झाले, तेच आता आपल्यातून हरवत चालल्याचे समोर येत आहे. केवळ मानवालाच नाही, तर पशू पक्षी, प्राणी यांनाही या मानवी हस्तक्षेपाचा त्रास होत आहे. अनेक भागात रात्रीच्या वेळी या ताऱ्याच्या प्रकाशात विहार करणाऱ्या प्राण्यांना भ्रमंतीसाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. काही फुले ही रात्रीच्या वेळी उमलतात. त्यावर परिणाम होत आहे.



## कुवारोंका गाँव



एखाद्या तरुणाचे लग्न न ठरण्यामागे अनेक कारणे असू शकतात. परंतु एखाद्या गावात कोणी आपली मुलगी नांदायला पाठवत नसेल तर याला काय म्हणायचे? लग्नाचे छत्तीस गुण जुळले तरी या गावात आपली मुलगी द्यायला कुठलाही बाप तयार होत नाही. त्यामुळे या गावाचे नावच 'कुंवारों का गाव' असे पडले आहे.

केरळातील जोंदालगट्टी गावात मुलगा लग्नाला आला की आई-बापाला ताण येतो कारण या गावात कुणाचे लग्नच जमत नाही. मुली या गावाशी नाते जोडण्यासाठी तयार होत नाहीत. थेट नकार देऊन टाकतात. अर्थातच या मागे गावाची आर्थिक स्थिती आणि दुर्दशा हे कारण आहे.


दुर्लक्षित खेड्याचा तरुणांना ताप

केरळला प्रगत राज्य मानले जात असले तरी आरोग्य सेवा, रस्ते आणि दळणवळणाच्या सुविधा तसेच आवश्यक यंत्रणा नसल्याने हे गाव दुलर्क्षित खेडे बनले आहे. त्यामुळे वधू येथील वर पसंद करायला तयारच होत नाहीत. सुमारे २०० लोकसंख्येच्या या गावात २० पेक्षा अधिक तरुण लग्न ठरण्याची अपेक्षा बाळगून आहेत. परंतु त्यांना कोणी मुलगी द्यायला तयार नाही. बरीच वर्षे तरुणांचे लग्न न झाल्याने गावातील तरुणांचे वैवाहिक जीवन सुरूच झालेले नाही. यामुळे येथील शाळेवरही परिणाम झाला आहे. येथील शाळेत मुलांची संख्या रोडावली आहे. या वर्षी कोणताही नवीन प्रवेश झालेला नाही. शाळेत केवळ पाच विद्यार्थी आहेत. अंगणवाडी रिकामी आहे. या गावात केवळ ४१ कुटुंबे राहतात.

## हिरवा रंग कशासाठी?

शस्त्रक्रिया करताना डॉक्टर निळ्या किंवा हिरव्या रंगाचे कपडे घालतात. तसंच त्यांच्या तोंडावर बांधायचा मास्कही हिरव्या रंगाचा असतो. असं का बरं होत असावं? जगभर डॉक्टरांनी एकाच रंगाचे कपडे घालण्यामागचं कारण काय असावं?

सुरूवातीच्या काळात डॉक्टरांपासून रुग्णालयातले सर्व कर्मचारी सरसकट पांढऱ्या रंगाचा पेहराव करायचे. पण १९१४ मध्ये एका मोठ्या डॉक्टरने एक ड्रेसकोड तयार केला. त्या अंतर्गत डॉक्टर हिरवे कपडे घालू लागले. मग हीच प्रथा पडली. काही डॉक्टर निळ्या रंगाचेही कपडे घालतात. रुग्णालयांमध्ये पडदेही हिरव्या किंवा निळ्या रंगाचे असतात. शस्त्रक्रियेदरम्यान हिरव्या रंगाचे कपडे घातल्याने डोळ्यांना थंडावा मिळत असल्यामुळे डॉक्टरांनी या रंगाचे कपडे घालायला सुरूवात केल्याचं एका जर्नलचं म्हणणं आहे. हिरवा रंग थंडावा देतो. इतर रंग असा थंडावा देत नाहीत. शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना मन एकाग्र करावं लागतं. त्यांचे डोळेही थकून जातात. त्यामुळे हिरव्या रंगाकडे पाहिल्यानंतर त्यांना आराम मिळतो. डोळ्यांना लाल किंवा पिवळ्या रंगाचा त्रास होतो. पण हिरव्या किंवा निळ्या रंगाचा तितकासा त्रास होत नाही. त्यामुळे रुग्णांच्या दृष्टीने डॉक्टर हिरव्या रंगाचे कपडे घालण्याला प्राधान्य देतात.



## फ्रान्समधले आगळे वेगळे

फ्रान्स हा युरोपमधल्या प्रमुख देशांपैकी एक. प्रत्येक देशाचे काही कायदे असतात. इथल्या काही प्रथा आपल्याला विचित्र वाटू शकतात. फ्रान्समधल्या अशाच काही अजब गजब गोष्टींविषयी आज जाणून घेऊ या. फ्रान्समधले लोक अन्नाला खूप महत्त्व देतात. या देशात अन्नाची नासाडी बेकायदेशीर ठरते. 'एप्रिलफूल' या संकल्पनेची सुरुवात फ्रान्समध्ये झाल्याचं म्हटलं जातं. इथल्या महिलांचं आयुष्यमान जगभरातल्या महिलांच्या तुलनेत अधिक असतं. फ्रान्समध्ये स्थूल लोकांची संख्या बरीच जास्त आहे. संपूर्ण युरोपमधल्या देशांच्या तुलनेत फ्रान्समध्ये सर्वाधिक स्थूल लोक आहेत. फ्रान्समध्ये गेल्या ५०० वर्षांपासून लग्नप्रसंगी नववधूने पांढरा पोशाख घालण्याची परंपरा आहे. जगाच्या सर्वाधिक भागावर राज्य करणारा इंग्लंड हा पहिला तर फ्रान्स हा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. एके काळी जगाच्या ८.६ टक्के भागावर फ्रान्सचं राज्य होतं. या देशात चक्क मृत व्यक्तीसोबत लग्न करता येतं. अर्थात यासाठी राष्ट्रपतींची परवानगी घ्यावी लागते. अपवादात्मक परिस्थितीत राष्ट्रपती मृत व्यक्तीसोबत लग्नाची परवानगी देतात.



# पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती जाहिरातीस मुदतवाढ द्यावी; कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यतेअभावी प्रक्रिया रखडली

### ३० जूनपर्यंत रिक्त होणाऱ्या पदांचा विचार करण्याची शिक्षक परिषदेची मागणी



कनिष्ठ महाविद्यालयीन संच मान्यतेचे प्रचलित निकष बदलण्याच्या विरोधात महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनास अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने जाहीर पाठिंबा दिला आहे.

नगर – संच मान्यता कनिष्ठ महाविद्यालयांची उपलब्धता अद्यापही प्रलंबित असल्याने पवित्र पोर्टलमार्फत होणाऱ्या शिक्षक भरतीच्या जाहिरातीस मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांच्या नेतृत्वाखाली माध्यमिक शिक्षणाधिकारी वर्षाताई गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. हे निवेदन त्यांच्या मार्फत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे तसेच शिक्षण आयुक्तांकडे पाठविण्यात आले आहे.

यावेळी शिक्षक परिषदेचे कोषाध्यक्ष बबन शिंदे, सुनिल दानवे, संजय पालवे, अशोक पवार, रावसाहेब गाणखेर, सुरेश सरोटे, मच्छिंद्र ढाकणे, एम. एस. साखरे, ए. पी. क्षीरसागर, जी. एम. शिंदे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील संच मान्यतेतील रिक्त पदांच्या आधारे पवित्र पोर्टलवर शिक्षक भरती प्रक्रिया राबविण्याचे आदेश प्राप्त झाले आहेत. मात्र, माध्यमिक विभागाशी संलग्न असलेल्या अनेक कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता अद्याप प्रलंबित असल्यामुळे संबंधित शाळांमध्ये रोस्टर तपासणी आणि रिक्त शिक्षक पदांची जाहिरात प्रक्रिया पूर्ण होऊ शकलेली नाही. परिणामी भरती प्रक्रियेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

शिक्षक परिषदेने शासनाकडे मागणी करताना स्पष्ट केले की, कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता उपलब्ध झाल्यानंतरच भरती जाहिरातीची अंतिम मुदत निश्चित करण्यात यावी. तसेच राज्यातील बहुसंख्य शिक्षकांची जन्मतारीख १ जून असल्याने दरवर्षी ३० जून रोजी मोठ्या प्रमाणावर शिक्षक सेवानिवृत्त होतात. त्यामुळे अनेक विद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहण्याची शक्यता असून त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर होऊ शकतो.

याच पार्श्वभूमीवर शिक्षक परिषदेने शासनाला विनंती केली आहे की, पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रियेसाठी ३१ मे पर्यंत रिक्त होणाऱ्या जागांचा विचार करण्याऐवजी ३० जून पर्यंत रिक्त होणाऱ्या पदांचा आधार घ्यावा. त्यानुसार भरती जाहिरातीस मुदतवाढ देऊन सर्व रिक्त पदांचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

कनिष्ठ महाविद्यालयांच्या संच मान्यता प्रलंबित असल्यामुळे अनेक ठिकाणी शिक्षक भरतीची प्रक्रिया रखडली आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन भरती जाहिरातीस मुदतवाढ द्यावी. तसेच ३० जूनपर्यंत रिक्त होणाऱ्या सर्व शिक्षक पदांचा समावेश केल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल आणि शाळांमधील शिक्षकांची कमतरता भरून निघेल, असे महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष, बाबासाहेब बोडखे म्हणाले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे १४ मे रोजी लोकार्पण; केंद्रीय मंत्री रामदास आठवले व अक्षय कर्डिले यांचा सत्कार





नगर – रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते कनगर (ता. राहुरी) येथे उभारण्यात आलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. सामाजिक समतेचा संदेश देणारा हा सोहळा १४ मे रोजी सायंकाळी ७ वाजता उत्साहात पार पडणार असून, या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात ना. रामदास आठवले यांची सलग तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवड झाल्याबद्दल त्यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तसेच राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत विजय मिळविल्याबद्दल आमदार अक्षय कर्डिले यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

या सोहळ्यासाठी राज्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती म्हणून राहणार आहेत. याशिवाय भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्यासह रिपब्लिकन पक्षातील अनेक राज्य कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहे. या सोहळ्यास जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांनी केले आहे.

कार्यक्रमासाठी पक्षाचे संपर्कप्रमुख तथा राज्य उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजयराव वाकचौरे, उत्तर महाराष्ट्र नेते राजाभाऊ कापसे, विभागीय अध्यक्ष भीमा बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, राहुरी तालुकाध्यक्ष विलास (नाना) साळवे, कनगर सरपंच सर्जेराव घाडगे, नगर शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष योगेश त्रिभुवन, जिल्हा कार्याध्यक्ष लॉरेन्स स्वामी, जिल्हा सरचिटणीस विजय भांबळ यांच्यासह अजय साळवे, गणेश कदम, अंकुश भैलुमे, रवींद्र दामोदरे, संजय भैलुमे, दत्ता कदम, विशाल काकडे, कुंडलिक गंगावणे, अमोल देवळेकर, सतीश भैलुमे, अविनाश भोसले, बाळासाहेब शिंदे, राजा जगताप, राजू उबाळे, बाबा राजगुरू आणि सतीश मगर हे देखील उपस्थित राहणार आहेत.

# ‘सेंट्रल बँक ऑफ इंडिया, नगर’तर्फे १५ मे रोजी ‘एमएसएमई क्रेडिट आऊटरीच’ व उद्यमिता मेळावा

### उद्योग क्षेत्रासाठी विविध कर्ज योजनांची माहिती; सुपा व नागापूर एमआयडीसीमध्ये आयोजन



नरेशकुमार दुबे

नगर – सेंट्रल बँक ऑफ इंडिया अहिल्यानगर यांच्या वतीने ‘एमएसएमई क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम’ व उद्यमिता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम १५ मे रोजी सुपा एमआयडीसी आणि नागापूर एमआयडीसी येथे होणार आहे.

उद्योग क्षेत्रातील जनजागृती वाढविणे, उद्योजकांना बँकिंग योजनांची माहिती उपलब्ध करून देणे तसेच विविध कर्ज सुविधांबाबत मार्गदर्शन करणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे बँकेच्या वतीने सांगण्यात आले.

या कार्यक्रमास सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्राचे क्षेत्रीय प्रमुख नरेशकुमार दुबे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष नवले यांच्यासह बँकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

नागापूर एमआयडीसी येथील कार्यक्रम सायंकाळी ४ वाजता प्लॉट क्रमांक D-52, AAMI हॉल, एमआयडीसी नागापूर, अहिल्यानगर येथे होणार असून सुपा एमआयडीसी येथील कार्यक्रम हॉटेल कुणाल पॅलेस, नगर–पुणे महामार्ग, एमआयडीसी सुपा, ता. पारनेर येथे पार पडणार आहे.

मेळाव्यात उद्योजकांना बँकेच्या विविध कर्ज योजनांविषयी माहिती देण्यात येणार आहे. यामध्ये ‘सेंट GST', ‘सेंट हॉटेल’, ‘सेंट संजीवनी (डॉक्टरांसाठी)’, ‘सेंट शॉप’, ‘सेंट बिझनेस’ आणि ‘सेंट इंजिनिअरिंग’ यांसारख्या योजनांचा समावेश आहे. तसेच नवीन ऋण योजना, उद्योग कर्ज सुविधा, उद्यमिता जनजागृती आणि बँकिंग सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

उद्योजक हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख कणा असून उद्योग क्षेत्राशी संबंधित योजना आणि बँकिंग सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व उद्योजकांनी या मेळाव्यात सहभागी होऊन विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक आंदोलनाला ‘माध्यमिक संघाचा पाठिंबा’ : सचिन झगडे

### शैक्षणिक समस्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालय व माध्यमिक शिक्षक सोबत लढणार



नगर – कनिष्ठ महाविद्यालयीन संच मान्यतेचे प्रचलित निकष बदलण्याच्या विरोधात महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या वतीने सुरू असलेल्या आंदोलनास अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने जाहीर पाठिंबा दिला आहे. शैक्षणिक समस्यांसाठी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक व माध्यमिक शिक्षक सोबत शासनस्तरावर संघर्ष करणार असल्याची माहिती माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांनी दिली.

संच मान्यतेचे विद्यमान निकष हे अनेक वर्षांपासून शासन निर्णयानुसार कार्यरत असून, कोणतीही व्यापक चर्चा न करता ते बदलण्याचा प्रयत्न होत असल्याने राज्यातील हजारो शिक्षकांच्या नोकरीवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर व शिक्षण व्यवस्थेवरही त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात.

महासंघाने मांडलेल्या मागण्या या शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हिताच्या असून शासनाने त्या सकारात्मकपणे मान्य कराव्यात, अशी आमची मागणी आहे. शिक्षण क्षेत्रातील स्थैर्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शिक्षकांचे हक्क अबाधित ठेवण्यासाठी प्रचलित संच मान्यता निकष कायम ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाने केलेल्या न्याय्य आंदोलनास आमच्या संघटनेचा नैतिक व संघटनात्मक पाठिंबा कायम राहील.

या आंदोलनाप्रसंगी दिलेले आश्वासन पाळले नाही व संच मान्यतेसाठी निकषांबाबत सकारात्मक धोरण नसेल तर कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघासोबत अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ सुद्धा आंदोलनात उतरेल असा इशारा अध्यक्ष सचिन झगडे यांनी दिला आहे. या आंदोलनाला महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे उपाध्यक्ष चांगदेव कडू, एम.एस. लगड, कोषाध्यक्ष राजेंद्र लांडे, शिवाजीराव ढाळे, शिक्षक नेते आप्पासाहेब शिंदे, शिरीष टेकाडे, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे सेक्रेटरी अमोल ठाणगे, खजिनदार अशोक सोनवणे, उपाध्यक्ष भालचंद्र देशमुख, सचिन फटांगरे, प्रसाद शिंदे, सोमनाथ सुंबे, सचिन जाधव, सहसचिव देविदास पालवे, राज जाधव, रावसाहेब शेळके, मोहन यादव, हिशोब तपासणीस संतोष आडकिते, देविदास सातपुते यांनी देखील पाठिंबा दर्शवला आहे.



भर उन्हात दुपारी एकच्या सुमारास घरगुती गॅस टाकी घेण्यासाठी ग्राहक आलेले असताना ग्राहक भांडार येथे गॅसचा साठा शिल्लक नाही, असा बोर्ड लावण्यात आला होता. त्याचवेळी गॅस टाकीच्या प्रतीक्षेत नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. (छाया – धनेश कटारिया)

# जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत अहिल्यानगरमध्ये १५ मे रोजी विशेष बैठक

### प्रश्न मार्गी लावण्यासाठी होणार थेट सुनावणी, कागदपत्रांसह उपस्थित रहावे : आमदार किशोर दराडे



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक आयोजित करण्यात आले आहे. ही बैठक १५ मे रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली.

या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सप क्रमांक ७५८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.

# तेरा वर्षीय मुलाच्या पोटावरुन गाडी घालून चिरडून मारले; पण राहाता पोलीस निरीक्षकांनी साधी दखलही घेतली नाही

### भाजपचे डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी मांडली पोलीस अधीक्षकांसमोर कैफियत



पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना निवेदन देताना डॉ. राजेंद्र पिपाडा.

नगर – राहाता येथे ओमकार गायकवाड या १३ वर्षीय मुलाच्या पोटावरून गाडी घालून त्याला चिरडून मारण्यात आले. या घटनेची माहिती देऊनही पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण यांनी साधी दखलही घेतली नाही. दोन दिवस गुन्हाही दाखल केला नाही. अखेर नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मुलाचा मृतदेह घेऊन आंदोलन केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षकांना कसलीही संवेदना उरली नाही. पोलीस निरीक्षक चव्हाण नेमके काय उद्योग करतात, याची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी झाल्यास अनेक गंभीर बाबी समोर येतील, असा आरोप भाजपचे डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी केला आहे.

राहाता शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा आणि पोलीस निरीक्षकांच्या कार्यपद्धतीविरोधात डॉ. पिपाडा यांनी अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन दिले. यावेळी पोलीस अधीक्षकांनी ही बाब गांभीर्याने घेत तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

डॉ. पिपाडा यांनी निवेदनात म्हटले आहे, राहाता पोलीस ठाण्यात सामान्य नागरिक तक्रार घेऊन गेला तर त्यालाच आरोपीप्रमाणे वागणूक दिली जाते. गुन्हेगार मोकाट फिरत आहेत आणि पोलीस निरीक्षक मात्र जनतेशी उद्धटपणे वागून आपली निष्क्रियता झाकत आहेत. अनेक चोरीच्या घटनांमध्ये फिर्याद दाखल करून घेण्यासही टाळाटाळ केली जात आहे. राहाता–शिर्डी या धार्मिक क्षेत्रात गुन्हेगारीने कळस गाठला आहे. या परिसरात महिला अत्याचार, छेडछाड, घरफोड्या, दरोडे, अवैध दारू विक्री, मटका आणि गुटखा तस्करी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मोबाईल चोरी, दुचाकी चोरी आणि खिशेकापूंच्या टोळ्या वाढल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत. महिलांना रस्त्यावरून चालणे कठीण झाले असून शाळा–महाविद्यालय परिसरात छेडछाडीचे प्रमाण वाढले आहे, अशी तक्रार डॉ. पिपाडा यांनी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे.

पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण यांच्या कार्यशैलीची चौकशी करून त्यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अन्यथा जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा डॉ. पिपाडा यांनी दिला आहे. शहरात विशेष गुन्हे प्रतिबंधक मोहीम राबवून अवैध धंदे तातडीने बंद करावेत आणि रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

# संविधान मूल्यांच्या प्रसारासाठी विजय कांबळे यांना ‘भारतीय संविधान गौरव पुरस्कार २०२६’ प्रदान



नगर – भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगरचे संरक्षण सचिव विजय लक्ष्मण कांबळे यांना मुंबई येथे आयोजित सोहळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करून सन्मानित करण्यात आले. नुकतेच मुंबई येथे झालेल्या या विशेष पुरस्कार सोहळ्यात अक्षय आंबेडकर व नंदेश विठ्ठल उमाप यांच्या हस्ते विजय कांबळे यांना सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. आशादीप महिला आधार मंच संलग्न ‘लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्य’ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसेवेसाठी कार्यरत असलेल्या व्यक्ती व संस्थांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

विजय कांबळे यांनी भिंगार व अहिल्यानगर परिसरात सामाजिक बांधिलकी जपत अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. समाजातील वंचित, गरजू व दुर्लक्षित घटकांसाठी सातत्याने कार्य करत त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, युवकांमध्ये संविधान जागरूकता निर्माण करणे तसेच सामाजिक ऐक्य आणि बंधुता वृद्धिंगत करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. विविध सामाजिक प्रश्नांवर जनजागृती मोहिमा राबवून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. संविधान मूल्यांचा प्रसार आणि समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# फेज २ व अमृत योजना पूर्ण नाही, भुयारी गटार व अमृत योजना फेज ३ साठी पुन्हा हजारो कोटींचा बोजा नको

### नव्या पाणी योजनेसाठी कर्जाला काँग्रेसचा विरोध



दीप चव्हाण

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेने नव्या पाणीपुरवठा योजनेसाठी ३७५ कोटी रुपये आणि भुयारी गटार योजनेसाठी ४५० कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून घेण्याच्या हालचाली सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी विरोध दर्शविला आहे. महापालिकेने यापूर्वी ११६ कोटीची फेज२ योजना २०१० मध्ये सुरू केली होती. ती अपूर्ण असून त्यातून थेंब भर पाणी देखील नगरकरांना मिळाले नाही. त्यानंतर २०१६ ला फेज २ पूर्ण करण्यासाठी १३४ कोटीची अमृत योजना मंजूर केली. म्हणजे तब्बल २५० कोटी खर्चून गेल्या १६ वर्षात नगरकर तहानलेलेच आहेत. मुळा धरणापासून नगर पर्यंत फेज २ मध्ये नव्याने पाइपलाइन टाकण्यात आली. नंतर अमृत योजनेत पुन्हा लाईन टाकण्यात आली. म्हणजे तीन–तीन पाईपलाईन टाकण्यात आल्या. मात्र नगरकरांना दिवसाआड तर उपनगरवासियांना ३ दिवसाआड आणि काही भागात तर टँकरने पाणी पुरवठा होतो आहे. उपनगरांमध्ये भुयारी गटार व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना स्वतःच्या खर्चाने सक्शन टँकरद्वारे मैला व्यवस्थापन करावे लागत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे भुयारी गटार योजना आवश्यक असली तरी नियोजनशून्य पद्धतीने कर्ज घेऊन शहराला आर्थिक संकटात ढकलू नये, असे मत त्यांनी व्यक्त केले.

महापालिकेकडे विविध योजनांमध्ये स्वनिधी हिस्सा भरण्यासाठीही पैसे नसताना कोट्यवधी रुपयांचे कर्ज उचलण्यामागे नेमके काय उद्दिष्ट आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. अगोदरच पाणी पट्टीत ९०० रुपयांची वाढ झाली. चालू बिलात २०० वाढवले. म्हणजे २६०० रुपये पाणीपट्टी होऊन देखील भविष्यात हे कर्ज फेडण्यासाठी घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर कर वाढवून त्याचा भार नगरकरांवर टाकला जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

महासभेत नगरसेवकांनी या प्रस्तावाला मान्यता देऊ नये तसेच जागतिक बँकेकडून कर्ज घेण्याचा निर्णय महापालिकेने तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी दीप चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

